सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ६४ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. २९ मार्च २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## जेव्हा लोकसभेत बोलायची वेळ होती तेव्हा हे व्हिएतनामला होते : अमित शाह

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९नवी दिल्ली**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि लोकसभेमधील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आपल्याला सभागृहात बोलू दिलं जात नसल्याचा आरोप केला होता. त्यानंतर आता केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी राहुल गांधींवर जोरदार टीका केली. लोकसभेत बोलण्यासाठी त्यांना जो वेळ देण्यात आला होता. तेव्हा ते व्हिएतनाममध्ये होते, असा टोला शाह यांनी लगावला. तसेच कर्नाटकमधील काँग्रेस सरकारने मुस्लिमांसाठी केलेल्या ४ टक्के आरक्षणाच्या घोषणेचा उल्लेख शाह यांनी लॉलीपॉप असा केला आहे.



राहुल गांधी यांनी संसदेच्या कार्यपद्धतीवर केलेल्या टीकेला प्रत्युत्तर देताना अमित शाह म्हणाले की, सभागृहात बोलण्याचे काही नियम असतात हे लोकसभेमधील विरोधी पक्षनेत्यांना कदाचित माहिती नसावे. सभागृह मनमानी पद्धतीने चालवता येत नाही. त्यांना अर्थसंकल्पावर चर्चेसाठी ४२ टक्के वेळ देण्यात आली होती. आता कुणी बोलावं हा त्यांचा प्रश्न आहे. मात्र जेव्हा संसदेत गंभीर विषयांवर चर्चा सुरू होती, तेव्हा ते व्हिएतनाममध्ये होते. तसेच जेव्हा ते माघारी परतले, तेव्हा त्यांनी आपल्या इच्छेनुसार बोलण्याचा हट्ट सुरू केला. संसदेचं कामकाज हे नियम आणि प्रक्रियांनुसार चालतं. एका कुटुंबाकडून चालवण्यात येणाऱ्या काँग्रेस पक्षाप्रमाणे चालत नाही, असा टोलाही त्यांनी लगावला.

दरम्यान, धर्माधारित आरक्षणावरही अमित शाह यांनी टीका केली. ते म्हणाले की, धर्माच्या आधारावर कुठलंही आरक्षण हे घटनेचं उल्लंघन आहे. तसेच असं आरक्षण न्यायालयांमधून रद्द करण्यात येईल. आम्ही धर्मावर आधारित कुठल्याही आरक्षणाच्या सक्त विरोधात आहोत.

## गृहयुद्धात अडकलेल्या म्यानमारवर निसर्गाची अवकृपा! विनाशकारी भूकंपात ७०० जणांचा बळी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९ नवी दिल्ली**

भारताच्या शेजारील राष्ट्र म्यानमार तसंच थायलंड या दोन देशांमध्ये शुक्रवारी विनाशकारी भूकंप झाला. या भूकंपात आतापर्यंत सातशे हून अधिक लोकांना आपला जीव गमवावा लागला आहे. तर दोन हजारांहून अधिक लोक जखमी आहेत. या भूकंपामुळे जवळपास ३० लाख लोक विस्थापित झाले आहेत.

म्यानमार आणि थायलंडमधील भूकंपाचे अनेक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. ज्यामध्ये अनेक इमारती पत्त्यांच्या बंगल्याप्रमाणे कोसळताना दिसत आहेत. तसंच अनेक रस्ते, पूलही काही क्षणात उद्ध्वस्त झाल्याचं पाहायला मिळत आहे.

### भारताकडून १५ टन मदत सामग्री रवाना



म्यानमारमध्ये शुक्रवारी झालेल्या भूकंपाची तीव्रता ७.७ रिश्टर स्केल इतकी मोजली गेली आहे. धक्कादायक बाब म्हणजे या भूकंपाची तीव्रता इतकी भीषण होती की म्यानमारच्या शेजारील राष्ट्रांमध्येही धक्के जाणवले. बांगलादेश, लाओस, चीनसह भारतातही भूकंपाचे धक्के जाणवले.

नॅशनल सेंटर फॉर सिस्मॉलॉजीनुसार, म्यानमारमध्ये भूकंप झाला तो १० किलोमीटर खोलीवर जाणवला, ज्यामुळे आफ्टरशॉकची शक्यता वर्तवली जात आहे. तर भूकंपानंतर म्यानमारमधील लष्करशाहीने भूकंपानंतर सहा प्रांतांत आणीबाणीची घोषणा केली आहे. मात्र, या भूकंपामुळे झालेले मृत्यू, जखमी आणि नुकसानीचा पूर्ण अंदाज अद्याप लावण्यात आलेला नाही.या देशात सध्या गृह युद्धात भडका उडाला असतानाच आलेल्या या नैसर्गिक आपत्तीमुळे नागरिकांचे प्रचंड हाल झाले आहेत. दरम्यान, या विनाशकारी भूकंपानंतर भारताने तात्काळ म्यानमारसाठी मदतीचा हात सरसावला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भूकंपामुळे उद्भवलेल्या परिस्थितीबाबत चिंता व्यक्त केली.

अडचणीच्या प्रसंगी भारत या दोन्ही देशांच्या बरोबर उभा आहे. दोन्ही देशांना लागेल ती मदत करण्यास भारत तयार असल्याचं त्यांनी म्हटलं. यानंतर तात्काळ भारताकडून १५ टन मदत सामग्री मदत म्हणून पाठवण्यात आली आहे. भारतीय हवाई दलाचे विमान हिंडन एअरफोर्स स्टेशनवरून मदत सामग्री घेऊन म्यानमारला रवाना झाले आहे.

## आमदारकीचे स्वप्न भंगल्याने पुण्यात अजित पवारांची राष्ट्रवादी थंड; पदाधिकाऱ्यांबरोबर कार्यकर्तेही शांत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९पुणे**

विधानपरिषदेच्या ५ जागा रिक्त झाल्या, त्यातील पक्षाकडे आलेली एक जागा पुणे शहराला मिळेल या अपेक्षेवर पाणी पडल्याने शहरातील राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्ष थंड झाल्याचे दिसते आहे. पक्षाकडून आरोपांना दिली जाणारी प्रत्युत्तरे तसेच वेगवेगळ्या प्रश्नांवर होणारी आंदोलने थांबली असून पदाधिकाऱ्यांबरोबर कार्यकर्तेही शांत झाले आहेत.

पक्षाला निवडून आलेले चेतन तुपे हे आमदार आहेत, मात्र त्यांचा हडपसर हा मतदारसंघ शहराचे उपनगर आहे. तुपे महापालिकेचे नगरसेवक होते, एकत्रित राष्ट्रवादीत पुणे शहराचे अध्यक्षही होते, फुटीनंतर महिनाभराचा विलंब लावून अखेर त्यांनी अजित पवारांची साथ देण्याचा निर्णय घेतला. आता दुसऱ्या वेळी आमदार झाल्यावर त्यांनी शहरातील लक्ष एकदम कमी करून टाकले आहे. त्यामुळेच शहरातील कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांना शहरात आमदारकी हवी होती.

राज्याच्या सत्तेतील महिला आयोगाचे अध्यक्षपद पक्षाच्या रुपाली चाकणकर यांच्याकडे आहे. त्या एकत्रित राष्ट्रवादी




काँग्रेसच्या पुणे शहराच्या महिला अध्यक्ष होत्या. त्यानंतर प्रदेश महिला अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम पाहिले. त्यांना त्यावेळीच महिला आयोगाचे अध्यक्षपद दिले गेले. फुटीनंतर त्या अजित पवार यांच्याबरोबर गेल्या. तिथे त्यांचे महिला आयोगाचे अध्यक्षपद कायम राहिले. इतकेच नव्हे तर सत्ताप्राप्तीनंतर त्यांना दुसऱ्या वेळीही ते पद दिले गेले. मात्र त्याही शहराचे उपनगर असलेल्या धायरीमधील आहेत. त्यांना दुसऱ्यांदा पद देण्यास शहरातून विरोध झाल्याने त्यांनीही शहरातून लक्ष काढून घेतले आहे.

दोन सत्तेची पदे असतानाही शहरात त्याचा काहीच उपयोग होत नसल्याने पदाधिकारी व कार्यकर्ते विधानपरिषदेची आमदारकी पुणे शहराला मिळावी म्हणून आग्रही होते. शहराध्यक्ष दीपक मानकर यांचे नाव त्यासाठी चर्चेत होते. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष असलेले उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे तशी मागणीही पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केली. मात्र पवार यांनी त्याकडे लक्षच दिले नाही. पक्षाकडे आलेली एकमेव जागा पवार यांनी लगेचच दुसऱ्या जिल्ह्याला दिली. त्यामुळेच इथलेच सर्व कार्यकर्ते, पदाधिकारी नाराज झाले आहेत. त्यातून त्यांना मरगळ आली आहे. विरोधात असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाकडून वारंवार आंदोलने केली जातात. त्यांना प्रत्युत्तर देण्याचे काम अजित पवार गटाकडून जोरात केले जात होते. ते आता जवळपास बंदच झाले आहे.

## धनंजय मुंडेंनी करुणा शर्मासोबत लग्न केलंच नाही, वकिलांचा युक्तिवाद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९बीड**

करुणा मुंडे यांना देखभालीचा खर्च देण्याच्या दंडाधिकाऱ्यांचा अंतरिम आदेशाला माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी सत्र न्यायालयात आव्हान दिले आहे. या प्रकरणी आज माझगाव सत्र न्यायालयात सुनावणी झाली. यावेळी धनंजय मुंडे यांच्या वकिलांनी करुणा शर्मा आणि धनंजय मुंडे यांचे लग्न अधिकृत नसल्याचा दावा केला. धनंजय मुंडे यांनी करुणा शर्मा यांच्याशी अधिकृत लग्न केलंच नाही, असा युक्तिवाद धनंजय मुंडे यांच्या वकीलांनी केला. यावेळी कोर्टाने शर्मा यांना अधिकृत लग्नाचा पुरावा आहे का? असा सवाल उपस्थित केला. यावेळी करणा शर्मा यांच्या वकिलांनी पुरावे सादर करण्यासाठी वेळ मागून घेतला.

कोर्टात युक्तिवादावेळी करुणा शर्मा यांच्या वकिलांनी पुरावे सादर करण्यासाठी वेळ मागून घेतला. अधिकृत लग्नाचे सगळे पुरावे आम्ही सादर करू, आम्हाला वेळ हवा आहे, असंही वकिलांनी सांगितलं. यानंतर पुढील तारखेपर्यंत आपण पुरावे सादर करा, असं न्यायालयाने म्हटले आहे. तसेच पुढील सुनावणी ५ एप्रिलला




होणार आहे.

धनंजय मुंडे यांनी करुणा शर्मा यांच्यासोबत अधिकृत लग्न केलेच नाही, असा युक्तिवाद धनंजय मुंडे यांच्या वकिलांनी केला. यावेळी न्यायाधीशांनी वकिलांना उलट प्रश्न केला. 'मग धनंजय मुंडे आणि करुणा शर्मा यांच्या दोन मुलाची आई आणि वडील कोण आहेत?, असं न्यायाधीशांनी म्हटले.

यावेळी धनंजय मुंडे यांचे वकील म्हणाले, मुंडे यांनी मुलांना स्वीकारलं आहे पण त्यांच्या आईशी लग्न केलेलं नाही. यावेळी कोर्टाने म्हटले, मुलं तुमची आहे म्हणता मग करुणा शर्मा त्यांच्या आई कशा नाहीत.

**१५ लाख इनकम तरीही पोटगीसाठी अर्ज**

यावळी धनंजय मुंडे यांच्या वकिलांनी करुणा शर्मा यांच्या इनकमचा मुद्दा उपस्थित केला. वकील म्हणाले, १५ लाखाच्या जवळपास वर्षाला इनकम करुणा शर्मा यांचा आहे, त्या इन्कमटॅक्स भरतात. त्या आर्थिक दृष्ट्या सक्षम आहेत तरी त्यांनी पोटगीसाठी अर्ज केला आहे.

दोन्ही मुलांना धनंजय मुंडे यांनी स्वीकारले आहे. त्यांना नावे दिली आहेत, करुणा शर्मा यांच्यासोबत काही काळ घालावला याचा अर्थ त्या धनंजय मुंडे यांच्या पत्नी होतं नाहीत. पती पत्नी सारखे त्यांचे संबंध नव्हते आणि अधिकृत लग्नही झाले नव्हते, असा युक्तिवाद धनंजय मुंडे यांच्या वकिलांनी कोर्टात केला.

## राज ठाकरेंना मोठा दिलासा; 'त्या' आरोपातून उच्च न्यायालयाने केली निर्दोष सुटका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९मुंबई**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांना मोठा दिलासा मिळाला आहे. २००८ च्या एका प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठा पुराव्याअभावी त्यांची निर्दोष मुक्तता केली आहे. घटनेच्यावेळी राज ठाकरे घटनास्थळी हजर नव्हते, त्यांनी बसवर दगडफेक केल्याचा व आंदोलनकर्त्यांना चिथावणी दिल्याचा कुठलाही पुरावा दोषारोपपत्रात नाही, असे न्यायालयाने म्हटले.

कुठलाही पुरावा नसल्यामुळे राज ठाकरेंविरुद्ध फौजदारी खटला चालविणे म्हणजे कायदेशीर प्रक्रीयेचा गैरवापर ठरेल, असे निरीक्षण नोंदवीत मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद



खंडपीठाच्या न्या. विभा कंकणवाडी आणि न्या. संजय देशमुख यांनी राज ठाकरे यांच्याविरुद्ध 'सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान केल्याबाबत' दाखल गुन्हा आणि दोषारोपपत्र रद्द करुन त्यांची निर्दोष सुटका केली.

२००८ साली राज ठाकरे यांच्या अटकेनंतर उसळलेल्या दंगलीत परळी- गंगाखेड मार्गावर एस टी बस थांबवून दगडफेक केल्याबाबत राज ठाकरेंसह मनसे कार्यकर्त्यांविरोधात सार्वजनिक मालमत्तेस नुकसान पोचवल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. हा गुन्हा रद्द करण्यासाठी राज ठाकरेंनी परळीच्या प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी न्यायालयात अर्ज दाखल केला होता. या अर्जाच्या सुनावणीअंती खंडपीठाने दि.२१ मार्च रोजी वरीलप्रमाणे आदेश दिला आहे.

## पंढरपूर कॉरिडॉरचे काम तीन महिन्यात सुरु होणार मुख्यमंत्री फडणवीसांची मोठी घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९पंढरपूर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा ड्रीम प्रोजेक्ट असलेल्या उज्जैन काशी विश्वेश्वरच्या धर्तीवर पंढरपूर कॉरिडॉरच्या कामाला येत्या तीन महिन्यांमध्ये सुरुवात होणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. आज त्यांनी श्री विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन घेत बैठकीमध्ये या प्रकल्पाचा आराखडा पाहिला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंढरपूरच्या विठ्ठल-रुक्मिणी मंदिराला भेट दिली. त्यानंतर त्यांनी विभागीय आयुक्त, पालकमंत्री, जिल्हाधिकारी आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. अधिकाऱ्यांनी तयार केलेल्या पंढरपूर कॉरिडॉरच्या कामाचा मुख्यमंत्र्यांनी आराखडा पाहिला. फडणवीस यांनी प्रकल्पाच्या आराखड्याला हिरवा कंदील दाखवला.

आत्तापर्यंत कोणत्याही प्रकल्पग्रस्तांना जितका मोबादला दिला नाही, त्यापेक्षा जास्त मोबदला पंढरपूरमधील कॉरिडॉर पाधितांना देण्यात येईल असे देण्यात येईल असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे.

## शेतकऱ्यांनो, पुढची तीन वर्ष 'नो' कर्जमाफी, अजित पवारांनी स्पष्टच सांगितले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९बारामती**

गेल्या वर्षी झालेल्या विधानसभा निवडणुकीच्या वेळेला महायुतीने शेतकऱ्यांना कर्जमाफी करु असे आश्वासन दिले होते. ते मान्य करतो मात्र आता राज्याची आर्थिक स्थिती लक्षात घेता शेतकऱ्यांना कर्जमाफी अशक्य असल्याची माहिती राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली आहे. शेतकऱ्यांनी ३१ मार्चच्या आधी आपल्या कर्जाची परतफेड करावी असे आवाहन त्यांनी केले आहे.

बारामती तालुक्यात माळेगाव सहकारी साखर कारखान्यावर झालेल्या शेतकरी मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी पवार यांनी शेतकरी कर्जमाफीचे दिलेले आश्वासन व त्यादृष्टीने शेतकऱ्यांकडून होत असलेल्या मागणीवर सरकारची भूमिका स्पष्ट केली.

अजित पवार म्हणाले, हो मान्य करतो की कर्जमाफीचे आश्वासन आम्ही दिले होते. मात्र सगळी सोंग करता येतात, मात्र पैशाचे सोंग करता येत



नाही. विधानसभा निवडणुकीत आम्ही आश्वासन दिले होते पण, सद्या राज्याची आर्थिक स्थिती पाहाता शेतकऱ्यांना पुढील तीन वर्ष तरी कर्जमाफी देणे शक्य नसल्याचे अजित पवार यांनी सांगितले.

अजित पवार पुढे म्हणाले, मी अर्थमंत्री म्हणून ११ अर्थसंकल्प सादर केले. नुकताच ७ लाख ३० कोटी रुपयांचा अर्थसंकल्प सादर केला. यावर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये शेतकऱ्यांना वीज बील माफी, लाडकी बहीण योजना, शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन यासह इतर योजनांसाठी तब्बल सव्वाचार लाख कोटी रुपयांची तरतूद करावी लागली. कर्जमाफी होईल या आशेने शेतकरी कर्ज भरत नसल्याचे दिसत आहे. मात्र, ३१ मार्चपूर्वी त्यांनी ते भरावे.

पवार म्हणाले, शेतकऱ्यांना जवळपास साडेसात हजार कोटी रुपयांची वीज बिल माफी देण्यात आली. शेतकऱ्यांना विज बिल माफ झाले असले तरी ती रक्कम शासनाला महावितरण कंपनीला द्यावी लागली आहे. लाडक्या बहिणींसाठी देखील ४५ हजार कोटींची तरतूद करावी लागली. त्यामुळे यावर्षी व पुढच्या वर्षी देखील शेतकऱ्यांना कर्जाची रक्कम भरावी लागेल हे स्पष्ट करतानाच त्यांनी परिस्थितीनुरूप निर्णय घेऊ असे आश्वासन देखील दिले.

## संपादकीय ......

# उबाठा सेनेचे पक्षप्रमुख सैरभैर

उबाठा सेनेचे पक्षप्रमुख हे मुख्यमंत्रीपदी होते मात्र आता त्यांची सत्ता गेल्यापासून ते सैरभैर झाले आहेत. त्यामुळे त्यांनी घेतलेली पत्रकार परिषद आणि त्यात मोदी सरकारवर आणि सध्याच्या कायदेशीरपणे निवडून आलेल्या महायुती सरकारवर चौफेर टीका केली. त्या टीकेत केवळ शिव्याशाप आणि फडणवीस सरकारवर प्रचंड टीका होती. पण त्या टीकेत अभ्यासूपणाचा जराही लवलेश नव्हता, ना कोणते व्हिजन होते. मुख्यमंत्रीपदी राहिलेल्या या माणसाकडे महाराष्ट्रासाठी काहीतरी व्हिजन किंवा दृष्टिकोन असेल असे वाटले होते. पण केवळ भाजपाला आणि मोदी यांना शिव्याशाप देण्यापलीकडे मुख्यमंत्रीपदी राहिलेल्या या नेत्याची मजल जात नाही हे अवघ्या महाराष्ट्राने पाहिले. नेहमीप्रमाणे उबाठानी भाजपावर तोंडसुख घेतले आणि त्यात नेहमीची पोपटपंची होती. पाशवी बहुमत मिळवलेल्या सरकारने असा आरोप त्यांनी सरकारवर केला, पण सरकारवर निरर्थक आरोप करताना त्यांचे आरोप किती हास्यास्पद आहेत याची खात्रीच त्यांनी सर्वांना पटवून दिली आहे. उबाठा यांच्याकडे आता बोलण्यासारखे काहीही नाही. पक्ष एकनाथ शिंदे कधीच घेऊन गेलेत आणि सत्ताही राज्यात नाही. केवळ दोन आणि चार उरलेल्या शिलेदारांवर प्रभाव टाकण्यासाठी बडबड करून आपले वर्चस्व कायम राखण्याची धडपड असे त्यांच्या पक्षाचे स्वरूप उरले आहे. त्यांच्या बडबडीला कितपत महत्त्व द्यायचे ते कुणालाही पटत नाही.

उबाठा पक्षप्रमुखांनी एक आरोप केला की, सरकारचा अर्थसंकल्प हा निरर्थक होता. पण उबाठा यांना अर्थसंकल्पातील काय कळते हाच मुळात प्रश्न आहे आणि तो सर्वांना माहीत आहे. त्यामुळे त्यांना अर्थसंकल्पावर बोलण्याचा काही अधिकार आहे की नाही हा प्रश्न उपस्थित होत आहे. अपयश लपवणारे हे अधिवेशन होते अशी एक लोणकढी थाप उबाठा पक्षप्रमुखांनी मारली. पण यांच्या म्हणण्यात काहीही सत्य नाही हे सर्वांनाच माहीत आहे. राज्य आज प्रगतिपथावर आहे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याला पुन्हा नंबर वन वर आणण्याचा निर्धार केला आहे हे सर्व राज्य जाणते. त्या दिशेने राज्याची पावले पडत आहेत आणि त्यामुळे उबाठा पक्षप्रमुखांचा पोटशूळ उठला आहे. कारण राज्य प्रगती करत आहे आणि त्यामुळे उबाठा पक्षप्रमुख आणि त्यांचा पक्ष यांचे धाबे दणाणले आहेत. येत्या मुंबई महापालिका निवडणुकीत उबाठा यांचे सर्वस्व पणाला लागले आहे आणि तेथेही त्यांची हार होणार आहे हे निश्चित आहे. त्यामुळे उबाठा पक्षप्रमुख सैरभैर झालेत. त्यामुळे ते बेताल बडबड करत आहेत यात काही शंका नाही. उबाठा पक्षप्रमुख म्हणतात की, शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबल्या नाहीत आणि त्या चालूच आहेत. पण शेतकरी आत्महत्या हा वेगळा विषय आहे आणि उबाठा पक्षप्रमुख मुख्यमंत्री असतानाही त्या चालूच होत्या. त्यांनी शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवण्यासाठी शेतकऱ्यांना निधी देऊ केला होता असा त्यांचा पक्ष दावा करतो. पण कित्येक शेतकऱ्यांनी आम्हाला एकही पैसा मिळाला नाही असे प्रत्यक्षात त्यांच्यासमोर सांगितले आहे. केवळ आपण केले असे दाखवायचे आणि प्रत्यक्ष करायचे काहीच नाही अशी उबाठा पक्षप्रमुखांची सवय आहे. ते म्हणतात की, या सरकारचा संकल्प कुठेच दिसला नाही. पण उबाठा पक्षप्रमुखांना भाजपा द्वेषाची कावीळ झाली असल्याने त्यांना चांगले काही दिसत नाही. त्यामुळे त्यांना या सरकारचे चांगले कामही दिसत नाही अशी स्थिती आहे. शेतकऱ्यांना कर्ज माफी याबाबत ते जे बोलतात ते नेहमीची रेकॉर्ड आहे आणि ती आता घासून गुळगुळीत झाली आहे. त्यामुळे सरकारने शेतकऱ्यांसाठी काय केले ते सांगितले तरी समजणार नाही.

मोदी सरकारने शेतकऱ्यांसाठी मासिक पेन्शन योजना सुरू केली आणि त्यांच्यासाठी प्रधानमंत्री किसान सन्मान योजना सुरू केली आहे आणि त्याद्वारे शेतकऱ्यांना थेट ६००० रुपये मिळतात आणि त्यासाठी आधार कार्डचा वापर केला जातो. त्यामुळे बोगस लाभार्थी दूर राहतात आणि खऱ्या लाभार्थींनाच मदत मिळते. पण उबाठा पक्षप्रमुखांना हे कोण सांगणार. त्यांचा सारा जन्म मोदी यांना आणि भाजपाला शिव्याशाप देण्यात चालला आहे. त्यासाठी त्यांना आपले पूर्वग्रह बाजूला ठेवून बघावे लागेल, तर त्यांना मोदी सरकारने आणि राज्यातील भाजपाच्या महायुती सरकारने शेतकरी आणि लाडक्या बहिणींसाठी काय केले आहे ते समजेल. उबाठा पक्षप्रमुखांनी टीका नेहमीप्रमाणे पातळी सोडून केली आहे आणि त्यांनी मोदी यांच्यावर सौगात ए मोदी नाही तर सौगात ए सत्ता अशी योजना आहे अशी टीका केली. कारण मोदी यांनी येत्या ईदच्या निमित्त मुसलमानांना भेट देण्याची योजना जाहीर केली आहे. मोदी यांनी अल्पसंख्याकांना भेट देणे हा फक्त उबाठाचा अधिकार आहे असे ते समजतात. भाजपाने केवळ मुसलमानांना ईदनिमित्त भेट दिली तर भाजपाने हिंदुत्व सोडले अशी टीका उबाठा करतात. पण खरी वस्तुस्थिती अशी आहे की, उबाठांनी हिंदुत्व सोडून चक्क औरंगजेबप्रेमी पक्षांशी हातमिळवणी केली आणि आता त्यांच्या या चोराच्या उलट्या बोंबा असा प्रकार सुरू आहे. भाजपाने ध्वजावरील भगवा रंग कधी काढला ते जाहीर करावे असे उबाठा म्हणतात. पण उबाठांनी अगोदर आपले हिंदुत्व सोडले आहे आणि त्यांना यावर भाजपावर टीका करण्याचा काहीही अधिकार नाही. उबाठांनी सैरभैर होऊन मोदी यांसारख्या नेत्यावर जो या देशाचा पंतप्रधान आहे त्यांच्यावर टीका केली आहे. आता त्यांना विधानसभा आणि लोकसभेत तर लोकांनी धडा शिकवलाच आहे. पण मुंबई महापालिकाही त्यांच्या हातून जाणार यात काही शंका नाही. उबाठानी अशीच बडबड करत राहावे म्हणजे त्यांचा पराभव अधिक जवळ येईल.

# बडनेरा-नाशिकरोड मेमूला ३० एप्रिलपर्यंत मुदतवाढ

## उन्हाळ्यामुळे रेल्वे गाड्यांची संख्याही कमी




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि २९बडनेरा** – अमरावती व बडनेरावासीयांसाठी महत्त्वाची व उपयोगी अनारक्षित बडनेरा-नाशिकरोड मेमू गाडीला उन्हाळ्यामुळे ३० एप्रिलपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. आधी ही मेमू ३१ मार्चपर्यंतच प्रस्तावित होती. उन्हाळ्यात प्रवाशांची गर्दी वाढते. ही बाब विचारात घेता मेमूला मुदतवाढ देण्यात आली आहे. बडनेरा स्थानकावरून सकाळी ११.०५ वाजता ही मेमू रवाना होते. त्यानंतर सायंकाळी ७.०५ वाजता नाशिक रोड येथे पोहोचते. त्यामुळे संतनगरी शेगांव, भुसावळ, नाशिक येथे जाण्यासाठी ही फारच सोयीस्कर गाडी असून सोबतच जवळचे स्थानक मुर्तिजापूर, अकोला, नांदुरा येथे जाण्यासाठीही उपयोगी आहे. कोल्हापूर-गोंदिया-कोल्हापूर (महाराष्ट्र) एक्सप्रेस क्र. ११०३९ कोल्हापूर गोंदिया एक्सप्रेस १ जूनपासून कोल्हापूर येथून एलएचबी कोच आणि सुधारित संरचनेसह निघेल. त्याचप्रमाणे गाडी क्र.११०४० गोंदिया – कोल्हापूर एक्सप्रेस ३ जूनपासून गोंदिया येथून एलएचबी कोच आणि सुधारित संरचनेसह रवाना होईल. सुधारित संरचनेनुसार एक द्वितीय वातानुकूलित, चार तृतीय वातानुकूलित, ७ शयनयान, ४ सामान्य द्वितीय श्रेणी, एक सामान्य द्वितीय श्रेणीसह गार्ड्स ब्रेक व्हॅन आणि १ जनरेटर कार या एक्सप्रेसला राहणार आहेत.

### पुणे येथे जाण्यासाठी सोयीस्कर राहणार

महाराष्ट्र एक्सप्रेस ही अमरावती, बडनेरावासीयांना शेगांव, पुणे येथे जाण्यासाठी सोयीस्कर गाडी आहे. पुणे येथे पहाटे ५ वाजताच्या सुमारास महाराष्ट्र एक्सप्रेस पोहोचते. त्यामुळे या महानगरात दिवसभर काही काम असेल तर ते पूर्ण करून रात्री १०.३० वाजता पुणे स्थानकावर येणाऱ्या महाराष्ट्र एक्सप्रेसने परतीचा प्रवास सुरू करता येतो. बडनेरा स्थानकावर ती दु. १२ वाजताच्या सुमारास पोहोचते. त्यामुळे ही गाडी पुणे तसेच कोल्हापूरला जाण्यासाठी तर उपयोगी आहेच. सोबतच बडनेरा स्थानकावरून कोल्हापूरकडे महाराष्ट्र एक्सप्रेस दु. २ वाजताच्या सुमारास प्रस्थान करते. तसेच सायं. ४ वाजताच्या सुमारास संत नगरी शेगाव येथे पोहोचते. त्यामुळे अनेक भाविक प्रवासी महाराष्ट्र एक्सप्रेसला शेगांवकडे जाण्यासाठी प्राधान्य देत असतात.

# आंबा, डाळिंब, बाजरीला कधी आणि किती पाणी द्यावे? जाणून घ्या सविस्तर

**दि.२९विदर्भ प्रजासत्ताक**

सद्यस्थितीत तापमानवाढले असून उन्हाळ बाजरी तसेच आंबा, डाळिंबपाणी व्यवस्थापन महत्वाचे ठरणार आहे. या काळात या तिन्ही पिकांच्या बाबतीत विशेष काळजी घेणे आवश्यक असते. त्यामुळे पाणी नियोजनकरताना पुढील गोष्टी लक्षात ठेवा....

**आंबापाणी व्यवस्थापन**

पाण्याच्या उपलब्धतेनुसार आठवड्यातून एकदा १०० लिटर पाणी प्रति झाड किंवा १५ दिवसांतून एकदा १५० ते २०० लिटर पाणी प्रति झाड या प्रमाणात फळे वाटाणा आकारापासून ते सुपारी आकाराची होईपर्यंत द्यावे. मात्र फळे काढणीस तयार होण्याच्या एक महिना अगोदर झाडास पाणी देणे बंद करावे. झाडाच्या बुंध्याभोवती आळ्यामध्ये गवताचे आच्छादन करावे, आंबा कलमांचे उन्हापासून संरक्षण करण्यासाठी झाडाच्या बुंध्याला बोर्डो पेस्ट लावावी.

**डाळिंब पाणी व्यवस्थापन**

डाळिंब बागेत सिंचनासाठी ठिबक किंवा सूक्ष्म सिंचन प्रणालीचा वापर करावा.

डाळिंब बागेत लागवडीच्या पहिल्या दोन वर्षांपर्यंत एका ओळीसाठी एक लॅटरल आणि प्रति झाडासाठी दोन ड्रीपर्स असावेत.









पुढे तिसऱ्या व चौथ्या वर्षासाठी दोन लॅटरल आणि चार ड्रीपर्स आणि पाचव्या वर्षापासून पुढे झाडांच्या वाढलेल्या आकारानुसार दोन लॅटरल आणि सहा ड्रीपर्स असे नियोजन करावे.

यातून पाण्याच्या गरजेची पूर्तता करणे शक्य आहे.

बागांची पाण्याची आवश्यकता ही झाडाचे वय, फळांचा भार, हंगाम आणि मातीचा प्रकार या घटकांवर अवलंबून असते.




**बाजरी पाणी व्यवस्थापन**

जमिनीच्या मगदुरानुसार व पिकाच्या वाढीच्या संवेदनक्षम अवस्थेत १० ते १२ दिवसांच्या अंतराने ५ ते ६ पाण्याच्या पाळ्या द्याव्यात.

पाण्याची उपलब्धता मर्यादित असल्यास, पहिले पाणी फुटवे येण्याच्या वेळी (पेरणीनंतर २० ते २५ दिवसांनी), दुसरे पाणी पीक पोटरीत असताना (पेरणीनंतर ३५ ते ४५ दिवसांनी), तिसरे पाणी दाणे भरतेवेळी (पेरणीनंतर ६० ते ६५ दिवसांनी) द्यावे.

– ग्रामीण कृषी मौसम सेवा आणि विभागीय संशोधन केंद्र, इगतपुरी.




## सकाळी उठल्यावर रिकाम्या पोटी जरूर खा कच्चा लसूण, मिळतील हे फायदे

**दि.२९विदर्भ प्रजासत्ताक**

लसूणचा वापर भारतीय जेवणात फोडणीच्या रूपात केला जातो. यामुळे खाण्याचा स्वाद वाढतोच. सोबतच लसूण आरोग्यासाठीही फायदेशीर असतो. लसूण एक आरोग्यदायी मसाल्याचा पदार्थ आहे. यात एलिसिन नावाचा घटक असतो. एलिसिनमध्ये अँटी इन्फ्लामेंटरी आणि अँटीऑक्सिडंट गुण आढळतात. यामुळे रक्त प्रवाह सुधारण्यास मदत होते.



लसूणचे सेवन रिकाम्या पोटी करणे फायदेशीर मानले जाते. हे सकाळी रिकाम्या पोटी खाल्ल्याने आरोग्यास अनेक लाभ मिळतात.

सकाळी रिकाम्या पोटी लसूण खाल्ल्याने पचनाशी संबंधित समस्या दूर होतात. यामुळे गॅस आणि ॲसिडिटीपासून सुटका मिळते.

ज्या लोकांना बद्धकोष्ठता, पोट फुगणे तसेच करपट ढेकर या समस्या असतील तर त्यांनी रिकाम्या पोटी लसूणचे सेवन जरूर करावे.

हाय ब्लड प्रेशरच्या रुग्णांसाठीही रिकाम्या पोटी लसूण खाल्ल्याने अधिक फायदे मिळतात.

लसूणमध्ये अनेक असे घटक आढळतात जे पोट आणि कमरेजवळची चरबी वेगाने घटवतात.

सकाळी रिकाम्या पोटी लसूणचे सेवन केल्याने अनेक फायदे मिळतात. यामुळे लिपिड प्रोफाईल व्यवस्थित करण्यास मदत होते. लसणीमध्ये नैसर्गिक अँटीबायोटिक गुण असतात. रिकाम्या पोटी लसूण खाल्ल्याने आतडे मजबूत होतात.

# विद्यापीठ हिवाळी भाषाविज्ञान फेरपरीक्षा ३ एप्रिल रोजी होणार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९अमरावती–** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाची हिवाळी एम. ए. (संस्कृत) सेमी –१ (एस. ई. पी.) व्याकरण व्यही भाषाविज्ञान या अभ्यासक्रम, विषयाच्या विद्यार्थ्यांची परीक्षा केंद्र क्र. १०३ वरील फेरपरीक्षा विद्यापीठ प्राधिकारिणीने घेतलेल्या निर्णयानुसार त्याच केंद्रावर ३ एप्रिल रोजी दुपारी दोन ते सायंकाळी पाच या वेळेत घेण्यात येणार आहे. परीक्षेच्या वेळी विद्यार्थ्यांनी त्यांना देण्यात आलेले प्रवेशपत्र सोबत आणावे, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन विभागाकडून करण्यात आले आहे. या संदर्भात सर्वसंबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य, केंद्राधिकारी, महाविद्यालये, परीक्षा केंद्रांना कळविण्यात आले असून महाविद्यालयांनी याची तातडीने विद्यार्थ्यांना माहिती द्यावी, तसेच विद्यार्थ्यांनी सुध्दा याची नोंद घ्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी यांनी केले आहे. अधिक माहितीकरीता त्यांच्याशी संपर्क साधता येईल, असे विद्यापीठाच्याद्वारे कळवण्यात आले आहे.



# कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनची अंतर्गत लेखापरीक्षकावर गंभीर तक्रार



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९ अचलपूर :** – १९कॉन्ट्रक्टर असोसिएशनने नगर परिषदेच्या मुख्य अधिकाऱ्यांना पत्र देत अंतर्गत लेखापरीक्षक श्री. उमेश निकोसे यांच्या विरोधात गंभीर तक्रार नोंदवली आहे. या तक्रारीत लेखापरीक्षकांच्या हलगर्जीपणा आणि गैरकारभाराबाबत असोसिएशनने आपली नाराजी व्यक्त केली आहे.अचलपूर कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनच्या वतीने देण्यात आलेल्या पत्रात म्हटले आहे की, कंत्राटदारांनी युनियनच्या माध्यमातून विविध विकासकामांसाठी अर्ज केले आहेत. मात्र, लेखापरीक्षक उमेश निकोसे यांनी कामांसाठी आवश्यक असलेल्या सिक्युरिटी डिपॉझिट (एस.डी.)चे प्रमाणपत्र संपूर्ण दोन वर्षांनंतरही उपलब्ध करून दिलेले नाही.

कंत्राटदारांच्या मते, कामाच्या दरम्यान लेखापरीक्षकांच्या त्रासाला सातत्याने सामोरे जावे लागत आहे. विशेषतः, एस.डी. परतावा मिळाल्यानंतर देखील उशीर केला जात आहे. लेखापरीक्षकांचे वर्तन अहंकारी असून, छोट्या-छोट्या चुका काढून कंत्राटदारांना अनावश्यक त्रास दिला जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे.अचलपूर कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनच्या म्हणण्यानुसार, इंजिनियरांनी मान्यता दिलेल्या कामांवर देखील लेखापरीक्षक उमेश निकोसे स्वाक्षरी करण्यास नकार देतात. परिणामी, कंत्राटदारांना त्यांच्या बिलांसाठी प्रलंबित राहावे लागते. अनेक वेळा कंत्राटदारांच्या महत्त्वाच्या फाईल्स हरवल्याचे देखील प्रकार घडले आहेत.लेखापरीक्षकांच्या त्रासामुळे त्रस्त झालेल्या काही कंत्राटदारांनी पोलिस स्थानकात तक्रार देखील दाखल केली होती. या संदर्भात नगर परिषद प्रशासनालाही वेळोवेळी माहिती देण्यात आली, परंतु अजूनही लेखापरीक्षकाच्या वर्तनात कोणताही बदल झालेला नाही.अचलपूर कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनने नगर परिषदेच्या मुख्य अधिकाऱ्यांना लेखापरीक्षक उमेश निकोसे यांच्या विरोधात कडक पावले उचलण्याची मागणी केली आहे. लेखापरीक्षकांच्या गैरकारभारावर योग्य ती कारवाई न केल्यास असोसिएशनने कायदेशीर मार्गाचा अवलंब करण्याचा इशारा दिला आहे.या पत्रावर अध्यक्ष किशोर य. कासार, उपाध्यक्ष महेश सरदार, आणि सचिव सलीम वारखे यांची स्वाक्षरी आहे. कंत्राटदारांच्या तक्रारीवर मुख्य अधिकाऱ्यांनी त्वरित लक्ष घालून आवश्यक ती कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.अचलपूर कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनच्या या तक्रारीनंतर नगर परिषदेत खळबळ उडाली आहे. लेखापरीक्षक उमेश निकोसे यांच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन कंत्राटदारांना न्याय द्यावा, अशी मागणी होत आहे.

**प्रशासनाची भूमिका महत्वाची**

या प्रकरणामुळे नगर परिषद प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर देखील प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. कंत्राटदारांच्या तक्रारीची नीट चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करणे गरजेचे असल्याचे अनेकांचे मत आहे. प्रशासनाच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

RNI No. - MAHMAR 2023/84526

Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

शनिवार दि. २९ मार्च २०२५ शहर/ग्रामिण


# जनसंवाद कार्यक्रमात ७०० च्यावर निवेदने सादर

## नागरिकाच्या विविध समस्या तात्काळ निकाली काढण्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे निर्देश





**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९अमरावती–** पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या जनसंवाद कार्यक्रमात विविध क्षेत्रातील स्थानिक समस्याबाबत नागरिकांनी ७००च्या वर निवेदने सादर केली. यावेळी त्यांनी नागरिकांच्या विविध समस्या, त्यांचे म्हणणे ऐकून घेत त्यांचे समाधान केले.

पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शुक्रवारी नियोजन भवन येथे नागरिकांच्या समस्या आणि तक्रारी जाणून घेण्यासाठी जनसंवाद कार्यक्रमात नागरिकांशी संवाद साधला. जनसंवाद कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.अमरावती मधील नागरिकांनी या जनसंवाद कार्यक्रमाला पचंड असा प्रतिसाद दिला. यावेळी जिल्ह्याचे पालकमंत्री व राज्याचे महसूलमंत्री बावनकुळे यांनी सर्व नागरिकांच्या तक्रारी समजून घेतल्यात.

पालकमंत्री यांना निवेदन देण्यासाठी नागरिकांच्या लांबलचक रांगा लागल्या होत्या. पालकमंत्री यांनी तक्रारी, निवेदने आणि समस्या घेऊन आलेल्या नागरिकांशी व्यक्तीशः संवाद साधला त्यांचे म्हणणे ऐकून घेतले. त्यांच्या तक्रारीवर येत्या आठ दिवसात कार्यवाही करण्यात येणार असून त्यासंबंधीची पोहोच पालकमंत्री कार्यालयातून येत्या आठ दिवसात देण्यात येणार आहे.

वीज बिल, मालकी पट्टे, रस्ते, नोकरी, कृषी, शेतकरी आत्महत्या, घरकुल, रस्ते, पाणी, क्रीडा या विषयावर सुमारे चार तास पालकमंत्री श्री. बावनकुळे यांनी नागरिकांशी संवाद साधला. यावेळी सुमारे सातशेच्या वर तक्रारी पालकमंत्री यांनी स्वतः स्वीकारल्या. पालकमंत्री यांनी नागरिकांशी चर्चा केली व त्यांचे म्हणणे ऐकून घेतले.अनेक लोक वैयक्तिक समस्यांची निवेदने घेऊन जनसवांद कार्यक्रमात आले होते. श्री. बावनकुळे यांनी नागरिकांच्या संबंधित निवेदनावर तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना प्रशासनातील अधिकाऱ्यांना दिल्या. यावेळी मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# 'एमपीएससी' परीक्षेसाठी वयोमर्यादेत वाढ

## अराजपात्रित गट ब मधील पोलीस उपनिरीक्षक व अन्य परीक्षेसाठी वाढविली एक वर्षाची वयोमर्यादा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९अमरावती**




राज्य लोकसेवा आयोग अर्थात महाराष्ट्र पब्लिक सर्व्हिस कमिशन म्हणजे सरकारी नोकऱ्यांचे आगार. प्रत्येक बेरोजगार आयोगाच्या जाहिरातीकडे लक्ष ठेवून असतो. पात्रतेनुसार जागा निघाल्या की त्यासाठी अर्ज करण्याची धावपळ उडते. यात वयोमर्यादा ही एक महत्वाची अट असते. ती पात्र नं करणारा उमेदवार मग नाराज होत नशिबाला कोसतो, अशी उदाहरणे दिसून येतात.

पण आता लोकसेवा आयोगातर्फे एक सवलत देण्याची घोषणा राज्य शासनाने केली आहे. महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा २०२५ तसेच महाराष्ट्र अराजपत्रित गट ब व गट क सेवा संयुक्त परीक्षा २०२४ अपेक्षित. यासाठी शासनाने मोठा निर्णय घेतला आहे. या परीक्षेची वयोमर्यादा ओलांडलेल्या उमेदवारांना वाढीव मुदत मिळणार. एक वर्षाची वाढ देण्यात येत असल्याचे माहिती व तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार यांनी ही घोषणा केली आहे.विधान परिषदेत मंत्री शेलार यांनी ही माहिती दिली. भाजपचे गटनेते प्रवीण दरेकर यांनी याबाबत प्रश्न उपस्थित केला होता. गट ब व गट क सेवा संयुक्त पूर्व परीक्षेसाठी वयोमर्यादा ओलांडलेल्या विद्यार्थ्यांना नव्याने संधी देण्यासाठी सरकारने काही पाऊल उचलले का व असेल तर काय, असा प्रश्न प्रवीण दरेकर यांनी मांडला. त्यावर उत्तर देतांना मंत्री शेलार यांनी भूमिका मांडली. ते म्हणाले की वयोमर्यादा वाढवावी अशी मागणी पुढे येत होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मुदत वाढवून देण्याची निवेदने प्राप्त झाली होती.या मागणीचा सकारात्मक विचार झाला पाहिजे, अशी भूमिका आली. ते लक्षात घेऊन अराजपात्रित गट ब मधील पोलीस उपनिरीक्षक व अन्य परीक्षेसाठी एक वर्षाची वयोमर्यादा वाढवून देण्याचा निर्णय घेतला आहे, असे उत्तर मंत्री आशिष शेलार यांनी दिले.

सद्यस्थितीत महाराष्ट्र नागरी सेवा राजपात्रित संयुक्त पूर्व परीक्षा २०२५, महाराष्ट्र अराजपात्रित गट ब आणि गट क सेवा संयुक्त परीक्षा २०२४ अश्या तीन परीक्षा पैकी गट ब ही दुसरी व गट क या दोन परीक्षांच्या वयोमर्यादा वाढीसाठी मागणी झाल्याने त्यातील काही पदांसाठी एक वर्षाची वयोमर्यादा वाढवून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, असे आशिष शेलार यांनी स्पष्ट केले. वयोमर्यादेत झालेली ही वाढ अनेकांना संधी देणार असल्याचे म्हटल्या जाते.

# शासनाची सकारात्मक प्रतिमा निर्माण करावी– पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे





**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९अमरावती,–**

जनतेला सेवा देणारे पोलिस हे एक महत्वाचे विभाग आहे. त्यामुळे पोलिसांनी नागरिकांशी संवाद ठेऊन शासनाची सकारात्मक प्रतिमा निर्माण करावी, असे आवाहन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले पोलिस आयुक्त कार्यालयात आज पोलिस विभागाचा आढावा घेण्यात आला. यावेळी आमदार प्रताप अडसड, केवलराम काळे, प्रविण तायडे, प्रविण पोटे, विशेष पोलिस महानिरीक्षक रामनाथ पोकळे, पोलिस आयुक्त नविनचंद्र रेड्डी, जिल्हा पोलिस अधिक्षक विशाल आनंद आदी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. बावनकुळे म्हणाले, येत्या काळात सण उत्सवाचे वातावरण असणार आहे. त्यामुळे अनुचित प्रकार घडू नये, यासाठी सर्व यंत्रणांनी सजग राहावे. प्रामुख्याने समाज माध्यमांवर लक्ष ठेवणे गरजेचे आहे. पोलिसांनीही व्हॉटसप ग्रुप तसेच काही संशयित नागरिकांच्या हालचालीवर लक्ष ठेवावे. यासाठी सायबर कक्ष सक्षम ठेवावा. यातून समाज माध्यमांवरील हालचालींबाबत दक्ष रहावे. यातून अलर्ट राहता येईल. गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यासाठी सीसीटीव्ही तसेच कृत्रिम बुद्धीमत्तेचा उपयोग करावा.पोलिस दलाचे आधुनिकीकरण करताना पुढील दशकाचा विचार करावा. त्यानुसार पद किंवा पायाभूत सुविधांचा प्रस्ताव तयार करावा. येत्या काळात १२ ते १८ वर्षे वयोगटातील मुले गुन्हेगारी टोळ्यांच्या निशाण्या वर असल्याने मुलांमधील गुन्हेगारी बिंबवणारे व्हीडीओ किंवा कारवायांवर लक्ष ठेवण्यात यावे. पोलिसांना गुन्हे उकलसाठी मदत व्हावी, पोलिस मित्र किंवा शासनातर्फे नेमण्यात येणाऱ्या विशेष कार्यकारी अधिकारी यांची मदत घ्यावी. त्यामुळे पोलिसांना समाजामध्ये घडणाऱ्या अनुचित प्रकाराची माहिती गतीने मिळण्यास मदत होईल, असे सांगितले.

### वैदर्भी मॉलचे उद्घाटन

पालकमंत्री श्री. बावनकुळे यांनी आज वैदर्भी या बचतगट उत्पादीत वस्तूंच्या मॉलचे उद्घाटन केले. सुरवातीला सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांनी कोनशिलेचे अनावरण केले. तसेच मॉलचे फित कापून उद्घाटन केले. त्यानंतर त्यांनी मॉलमधील बचतगटांनी उत्पादीत केलेल्या खाद्यपदार्थांची पाहणी केली.

# अमरावती उपविभागीय कार्यालयाचे संकेतस्थळ सुरू

## संकेतस्थळावर प्रवेश करण्यासाठी QR कोडची निर्मिती

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९अमरावती–** मुख्यमंत्री यांच्या १०० दिवसांच्या कृती आराखडा उपक्रमांतर्गत सुलभ, लोकाभिमुख व गतिमान प्रशासनाचा एक भाग म्हणून सर्वसामान्य जनतेशी संवाद साधण्याच्या उद्देशाने उपविभागीय अधिकारी, अमरावती यांनी त्यांच्या कार्यालयाचे्‌ु.विरीरींरींळ.ला हे संकेतस्थळ तयार केले आहे. या संकेतस्थळाचे उद्घाटन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते आज जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवन येथे करण्यात आले.

जिल्हाधिकारी सौरभ कटियार, मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती संजिता महापात्र, महापालिका आयुक्त सचिन कलंत्रे आदी यावेळी उपस्थित होते.

उद्घाटनप्रसंगी उपविभागीय अधिकारी अनिल भटकर यांनी संकेतस्थळाची आवश्यकता आणि त्याची वैशिष्ट्ये विशद केली. संकेतस्थळामध्ये अमरावती उपविभागाचा इतिहास, अमरावती विभागातील सर्व गावांचे नकाशे उपलब्ध करून देण्यात आले आहेत. त्यामुळे सामान्य शेतकऱ्याला त्याच्या शेताच्या नकाशासाठी कोठेही फिरण्याची आवश्यकता नाही. तो संकेतस्थळावरून नकाशा डाउनलोड करून आपले काम करू शकतो.या संकेतस्थळामध्ये प्रशासकीय



सेटअपमध्ये अधिकारी ते कर्मचारी अशी सर्वांची नावे आणि त्यांच्याकडे नेमून दिलेली कामे यांची माहिती उपलब्ध असल्यामुळे सामान्य नागरिकांना त्यांच्या कामासाठी नेमके कोणाकडे जावे याची अडचण येणार नाही. संकेतस्थळावर रोजगार हमी योजना, अन्न व नागरी पुरवठा विभाग, संजय गांधी निराधार योजना, माहितीचा अधिकार कायदा, लोकसेवा हक्क कायदा यांसारख्या योजना आणि कायद्यांविषयी माहिती, संबंधित शासन निर्णय आणि



योजनांचा लाभ घेण्यासाठीच्या अटी व अर्ज उपलब्ध आहेत. त्यामुळे नागरिकांना आवश्यक असणारे अर्जाचे नमुने संकेतस्थळावरून डाउनलोड करता येतील आणि त्यांना अर्जासाठी कोठेही जाण्याची आवश्यकता भासणार नाही. संकेतस्थळाच्या मीडिया गॅलरीमध्ये कार्यालयामार्फत आयोजित विविध शिबिरे आणि कार्यक्रमांचे फोटो अपलोड करण्यात आले आहेत. तसेच, संकेतस्थळावर कार्यालयाचा हेल्पलाईन क्रमांक आणि ई-मेलही दिलेला आहे.या संकेतस्थळावर प्रवेश करण्यासाठी ठठ कोडची निर्मिती करण्यात आल्यामुळे नागरिक सहजपणे संकेतस्थळावर पोहोचू शकतात. हा ठठ कोड सर्वत्र प्रसिद्ध करण्यात आला आहे.पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. राज्यात उपविभागीय अधिकारी कार्यालयाचे हे दुसरे संकेतस्थळ आहे. ही योजना संपूर्ण राज्यात राबविण्यात येईल, असे त्यांनी जाहीर केले.

# आरोग्य विभागाच्या प्रयत्नांमुळे मेळघाटातील ६५ डम्बा दिलेल्या नवजात बालकाला नवजीवन

## पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे प्रयत्न सार्थकी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९अमरावती–** मेळघाट भागातील सिमोरी येथील २२ दिवसांच्या एका नवजात बालकाला आरोग्य विभागाच्या अथक प्रयत्नांमुळे जीवनदान मिळाले आहे. या बालकाच्या आईने त्याच्या पोटावर तब्बल ६५ डम्बा (विळयाचे चटके) दिले होते. फुलवंती राजू धिकार बालकाच्या आईचे नाव असून, सिमोरी, तालुका चिखलदरा, जिल्हा अमरावती येथील रहिवासी आहे.

घडलेल्या घटनेनुसार,२२ फेब्रुवारी २०२५ रोजी आई फुलवतीने तिच्या बाळाच्या पोटावर गरम विळयाच्या ६५ चटके दिले होते. २४ फेब्रुवारी २०२५ रोजी रात्री ११.३० वाजता अत्यंत गंभीर अवस्थेत जिल्हा स्त्री रुग्णालय, अमरावती येथील एसएनसीयू (नवजात शिशु अतिदक्षता विभाग) मध्ये दाखल करण्यात आले. जिल्हा स्त्री रुग्णालयात केलेल्या तपासणीमध्ये बाळाला जन्मजात हृदयविकार असल्याचे निदान झाले. यामुळे बाळाची प्रकृती अत्यंत चिंताजनक बनली होती. डॉक्टरांनी त्याला पुढील उपचारांसाठी नागपूर येथे संदर्भीत करणे आवश्यक असल्याचे सांगितले होते.

परंतु, बाळाचे आई-वडील त्याला नागपूरला पाठवण्यास तयार नव्हते. या कठीण परिस्थितीत, जिल्हा प्रशासनाने यात तातडीने हस्तक्षेप केला. मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश असोले, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रविण पारिसे, मेळघाट विभागातील आरोग्य अधिकारी डॉ. तिलोत्तमा वानखडे, जिल्हा स्त्री रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. विनोद पवार, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अरुण साळुंके, एसएनसीयू इन्चार्ज डॉ. प्रीती इंगळे, डॉ. अमोल फाले आणि मेळघाटमधील समुपदेशक अलका झामरकर, प्रकाश खडके तसेच सिमोरी गावातील आशा कार्यकर्ती या सर्वांनी एकत्रितपणे



जिल्हा स्त्री रुग्णालयात फुलवती आणि तिच्या नातेवाईकांची भेट घेतली. त्यांनी अथक प्रयत्न करून आई-वडिलांना समजावून बाळाच्या उपचारासाठी नागपूरला नेण्याची गरज सांगितली. या प्रयत्नांना यश आले आणि रुग्णाचे नातेवाईक नागपूरला जाण्यासाठी तयार झाले.या प्रकरणाची जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दखल घेत विशेष रुग्णवाहिकेने पोलीस बंदोबस्तात त्या बालकाला नागपूर येथे उपचारस्ताही दाखल केले व वेळोवेळी त्या बाळाची उपचारासम्बधीची माहिती घेत राहिले. २७ फेब्रुवारी २०२५ रोजी बाळाला पुढील उपचारासाठी नेल्सन हॉस्पिटल, नागपूर येथे दाखल करण्यात आले. तिथे तिच्यावर तातडीने उपचार सुरू करण्यात आले. सर्व आवश्यक तपासण्या पूर्ण झाल्यावर डॉक्टरांनी बाळावर हृदय शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला आणि ७ मार्च २०२५ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत ही शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पडली.डॉक्टरांनी केलेले सततचे प्रयत्न आणि उपचार यामुळे २५ मार्च २०२५ रोजी आईने बाळाला स्तनपान करण्यास सुरुवात केली. नेल्सन हॉस्पिटलमधील डॉक्टरांनी दिलेल्या माहितीनुसार, सध्या बाळाची प्रकृती स्थिर आहे आणि त्याला उद्या, दि. २९ मार्च २०२५ रोजी हॉस्पिटलमधून डिस्चार्ज देण्यात येणार आहे.

या नवजात बालकाचे प्राण वाचवण्यासाठी डॉ. विनोद पवार, डॉ. प्रीती इंगळे, डॉ. अरुण साळुंके, डॉ. अमोल फाले आणि एसएनसीयू मधील सर्व डॉक्टर्स, सिस्टर्स आणि वॉर्ड बॉय यांनी अत्यंत समर्पित भावनेने कार्य केले. डॉ. विनोद पवार यांच्या विशेष प्रयत्नांमुळे मेळघाटातील या बालकाचे उपचार राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत (ठइडघ) नेल्सन हॉस्पिटल नागपूर येथे मोफत करण्यात आले. या संपूर्ण चमूने एकत्र येऊन केलेल्या प्रयत्नांमुळे बाळाला नवजीवन मिळाले आहे.

# ‘महाज्योती’च्या विद्यार्थ्याला मिळाले ‘ब्रेस्ट कॅन्सर’वर संशोधनाचे जर्मन पेटेंट

## बायोमासपासून औषध निर्माणासाठी संयुगांवर डॉ. अक्षय गुरव यांचा अभ्यास

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९नागपूर–** बदलत्या जीवनशैलीमुळे आणि असंतुलित आहारामुळे अनेक आजारांचे प्रमाण वाढत आहे. त्यापैकी एक गंभीर आजार म्हणजे कर्करोग (कॅन्सर) होय. जगभरात जितक्या वेगाने प्रगती होत आहे त्याच वेगाने कॅन्सर आपले पाय पसरत आहे. कॅन्सर हा एक गंभीर आजार असून दरवर्षी या आजारामुळे जगात लाखो लोकांचा बळी जात आहे. कॅन्सर आजारावर औषध काढण्यासाठी अनेक वैज्ञानिक आणि संशोधक प्रयत्न करीत आहे. अशातच भारतामध्ये स्तनांचा कर्करोगाचे (ब्रेस्ट कॅन्सर) रुग्ण वाढत आहेत, जे या रोगाच्या वाढत्या प्रसाराचे चिंताजनक संकेत आहेत.

ब्रेस्ट कॅन्सर या आजारावर यशस्वी निदान करण्याचे संशोधन महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) डॉ. अक्षय पांडुरंग गुरव यांनी केले. याशिवाय डॉ. गुरव यांनी १० आंतरराष्ट्रीय रिसर्च पेपर पब्लिश केले आणि ३ पेटेंट पब्लिश करून उल्लेखनिय कामगिरी त्यांनी केली आहे.

बायोमास पासून निर्मित फुरफुरालस ह्या संयुगांचा वापर करून हायड्राझिनिल थायाझोल हे संयुग बनविण्यात यश मिळविले आहे. ही संयुगे ब्रेस्ट कॅन्सरवरील आधुनिक आणि प्रभावी उपचारांसाठी मोलाचे ठरणार आहे. कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठाच्या अधिविभागातील सेंद्रिय रसायनशास्त्र संशोधक डॉ. अक्षय पांडुरंग गुरव यांनी त्यांचे संशोधक मार्गदर्शक डॉ. शंकर हांगिरगेकर यांच्या मदतीने बायोमासपासून औषध निर्माण क्षेत्रासाठी अत्यंत उपयुक्त असणाऱ्या संयुगांची निर्मिती करण्यात यश मिळविले आहे. संशोधकांनी ग्राइंडस्टोन केमिस्ट्री वापरून बायोमासपासून हायड्रॉक्झी मिथाईल फुरफुराल हे मूलद्रव्य वापरून नवीन हायड्राझिनिल थायाझोल संयुगे तयार करण्याची पद्धती शोधली आहे. या शोधाला जर्मन चे प्रतिष्ठित पेटंट मिळाले आहे.

डॉ. गुरव यांनी सांगितले की, या संशोधनात नवीन हायड्राझिनिल थायाझोल संयुगे तयार करण्यासाठी ग्राइंडस्टोन केमिस्ट्री या अत्यंत सोप्या आणि पर्यावरणपूरक पद्धतीचा वापर करण्यात आला.

या नव्या पद्धतीमध्ये कोणत्याही उत्प्रेरकाचा किंवा द्रावणाचा वापर न करता कमी वेळेत उत्कृष्ट उत्पादन मिळवता आले. बायोमासपासून निर्मित फाईव्ह हायड्रॉक्सी मिथाइल फुरफुराल (एचएमएफ) याचा महत्त्वपूर्ण घटक म्हणून वापर करून औषध निर्माण क्षेत्रात उपयुक्त असलेल्या हायड्राझिनिल थायाझोल संयुगांचा संग्रहच तयार केला.

हे संशोधन औषध निर्माण क्षेत्रासाठी अभिनव ठरले आहे. पर्यावरणपूरक रसायनशास्त्रातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. या पद्धतीच्या वापरामुळे शाश्वत विकासाला चालना मिळेल तसेच हा शोध हरित संशोधनाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल ठरेल, असे मत डॉ. गुरव यांनी व्यक्त केले.

# उद्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी नागपुरात

## असा आहे दौरा, संघभूमी, दीक्षाभूमीला भेट देणार, कडेकोट बंदोबस्त

**विदर्भ प्रजासत्ताक**



**दि.२९नागपूर –** पंतप्रधान नरेंद्र मोदी रविवारी ३० मार्चला नागपूर दौऱ्यावर येत आहेत. त्यांचे या दौऱ्यात भरगच्च कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे. शुक्रवार पासून कार्यक्रम स्थळी व त्या मार्गावर कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. राष्ट्रीय स्वंयसेवक संघाचे स्वंयसेवक ते प्रचारक असा प्रवास असणाऱ्या मोदींनी ते पंतप्रधान झाल्यानंतर नागपूरमध्ये येऊनही संघभूमीवर जाणे टाळले होते. याबाबत तर्कवितर्क लावले जात होते. पण कधीही मोदींनी याबाबत भाष्य केले नव्हते. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीच्या काळात प्रचारासाठी विदर्भात आलेल्या मोदींचा मुक्काम नागपुरात राजभवनात होता, पण रेशीमबागेतील संघाचे स्मृती मंदिर किंवा महालातील संघ मुख्यालयात ते गेले नाहीत.

यावेळी मात्र खास संघाशी संबंधित एका नेत्रालयाच्या विस्तारित इमारतीच्या निमित्ताने गुडीपाडव्याला म्हणजे ३० मार्चला मोदींचा नागपूर दौरा ठरला. या दौऱ्यात त्यांचा पहिला कार्यक्रम संघभूमी अशी ओळख असलेल्या रेशीमबागेतील हेडगेवार स्मृती मंदिरात होणार आहे. हेडगेवार यांच्या समाधीचे ते दर्शन घेणार आहेत. नेत्रालय इमारतीच्या भूमिपूजन कार्यक्रमात त्यांच्यासोबत व्यासपीठावर सरसंघचालक डॉ. मोहन भागवत असणार आहेत. मोदी अन्य कार्यक्रमातही उपस्थित राहणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स ९ वा. नागपूर विमानतळावर आगमन होणार असून तेथून ते थेट रेशीमबागेतील राष्ट्रीय स्वंयसेवक संघाच्या स्मृती मंदिर स्थळी जाणार आहेत. तेथे हेडगेवार यांच्या समाधीचे दर्शन घेऊन ते दीक्षाभूमीला भेट देतील. दहा वाजता पंतप्रधानांच्या हस्ते हिंगणामार्गावरील माधव नेत्रालयाच्या प्रीमिअम केंद्राची पायाभरणी होणार आहे. त्यानंतर ते एका जाहीर सभेला संबोधित करतील. दुपारी १२:३० वाजता, अमरावतीपलीÿ मार्गावरील सोलर डिफेन्स अँड एरोस्पेस लिमिटेड येथे लॉइटरिंग युद्धपयोगी सामग्री चाचणी तळ आणि यूएव्हीसाठी धावपट्टी सुविधेचे उद्घाटन मोदींच्या हस्ते होईल. त्यानंतर पंतप्रधान बिलासपूरला रवाना होतील.

# दुय्यम सहनिबंधक कार्यालयाला महसूल मंत्र्यांची अचानक भेट

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९अमरावती–** विभागीय आयुक्त कार्यालयातून निघालेले पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आपला ताफा अचानक जुन्या तहसील कार्यालयातील सह दुय्यम निबंधक कार्यालयाकडे वळविला. थेट खरेदी–विक्रीच्या टेबलवर बसून आलेल्या नागरिकांना खरेदीसाठी किती अतिरिक्त पैसे दिले याची विचारणा केली. यावेळी त्यांनी खरेदीसाठी अतिरिक्त पैसे मोजू नये, असे आवाहन केले.

अमरावती येथील सह दुय्यम निबंधक वर्ग दोन अमरावती ग्रामीण कार्यालयात शेती, जमीन, घरे खरेदी–विक्री करण्यासाठी शासकीय नियमानुसार असलेल्या २ टक्के शुल्काशिवाय अतिरिक्त पैसे घेतात, तसेच दलाल सक्रीय असल्याची तक्रार पालकमंत्री यांच्याकडे स्थानिक नागरिकांनी केली होती. या तक्रारीची तातडीने दखल घेत पालकमंत्र्यांनी स्वत: कार्यालयात जाऊन खरेदी–विक्रीसाठी आलेल्या नागरिकांशी संवाद साधला. त्यांच्याकडून खरेदीसाठी नोंदणी आणि मुद्रांकाशिवाय किती रक्कमेची मागणी करण्यात आल्याची विचारणा केली.

नागरिकांनीही पाच हजार रूपये देण्यात आल्याचे सांगितले. यावरून पालकमंत्र्यांनी नाराजी व्यक्त केली. उपस्थित अधिकाऱ्यांना कार्यालयातील अतिरिक्त शुल्क आकारण्यावर नियंत्रण करण्याच्या सूचना दिल्या. कर्मचाऱ्यांनी विहित केल्यापेक्षा अतिरिक्त पैसे स्विकारल्यास कठोर कार्यवाही करण्याचा इशारा दिला. नागरिकांच्या तक्रारी पाहता येत्या काळात सर्व नोंदणी कार्यालयात आकस्मात भेटी देण्यात येतील. गैरप्रकार आढळल्यास तातडीने कार्यवाही करण्यात येईल. वरीष्ठ अधिकाऱ्यांनी याबाबत योग्य ती कारवाई करावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.



# काँग्रेस नेते दीपक सलामपूरीया अपघातात ठार; टिप्परने दिली जोरदार धडक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९बुलढाणा–** बुलढाणा : भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे शेगाव शहर माजी अध्यक्ष दीपक सलामपुरिया यांचा टिप्परने दिलेल्या जोरदार धडकेमध्ये जागीच मृत्यू झाला. शेगाव शहरातील मुरारका उच्च माध्यमिक शाळे जवळील वळणावर शुक्रवारी, २८ मार्चला हा दुर्दैवी अपघात घडला.दीपक सलामपुरिया यांची शेगाव बाळापुर मार्गावर वर मुरारका हायस्कूल जवळ दूध डेयरी आहे. आज शुक्रवारी दुपारी ते दुकानावरून समोरच्याच खुल्या जागेत लघवीसाठी गेले होते. तिथून परत येताना रस्ता ओलांडताना भरधाव वेगाने येणाऱ्या टिप्परने त्यांना जोरदार धडक दिली यामध्ये त्यांचा जागीच मृत्यू झाला. परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांना लगेच शेगाव येथील सईबाई मोटे शासकीय उपजिल्हा रुग्णालयामध्ये उपचारासाठी नेण्यात आले. मात्र डॉक्टरांनी तेथे त्यांना मृत घोषित केले.



भूमी मुक्ती मोर्चाचीराज्य कार्यकारिणी बरखास्त खामगांव येथील विश्राम भवनात भूमी मुक्ती मोर्चा व बहुजन मुक्ती मोर्चा संयुक्त संघटनाची जिल्हास्तरीय बैठक शुक्रवारी पार पडली.संस्थापक अध्यक्ष भाई प्रदीप अंभोरे यांचे मार्गदर्शनात सुपडा इंगळे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. यावेळी रमेश गाडेकर, सारगधर वाकोडे,अशोक इंगळे,भरत मुंडे,संजय पाटील,अमोल पाटील, अनिल कांबळे, शेषराव चव्हाण, शेषराव तायडे,किशोरसिंग राजपूत, सुखदेव कटारे,रामचंद्र नाईक,रमेश इंगळे, सारंगधार टापरे नाना तायडे आदिची प्रमुख उपस्थिती होती.

# महावितरणची लकी डिजिटल ग्राहक योजनापहिला लकी ड्रा ७ एप्रिलला

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९अमरावती–** महावितरण च्या लकी डिजिटल ग्राहक योजनेचा पहिला लकी ड्रा ऑनलाईन पध्दतीने दि. ७ एप्रिल २०२५ रोजी काढण्यात येणार आहे. यातून प्रत्येक उपविभाग स्तरावर एक प्रमाणे पहिल्या क्रमांकाकरिता ६५१ विजेत्या ग्राहकांना स्मार्ट फोन बक्षिस म्हणून दिला जाणार आहे. तर प्रत्येक उपविभागात प्रत्येकी दोन प्रमाणे दुसऱ्या क्रमांकासाठी १३०२ विजेत्या ग्राहकांना स्मार्ट फोन व प्रत्येकी दोन प्रमाणे तिसऱ्या क्रमांकासाठी १३०२ विजेत्या ग्राहकांना स्मार्ट वॉच बक्षिस म्हणून दिले जाणार आहे. यापुढील लकी ड्रा मे व जून २०२५ या महिन्यात काढण्यात येणार आहेत.

महावितरणने ऑनलाईन वीज बिल भरणाऱ्या ग्राहकांचा टक्का वाढविण्याच्या हेतूने लकी डिजिटल ग्राहक योजना सुरू केली आहे. या योजनेसाठी ऑनलाईन पध्दतीने वीज बिल भरणा करणारे सर्व लघुदाब वीज ग्राहक पात्र ठरणार आहेत. १ जानेवारी ते ३१ मे २०२५ या कालावधीत सलग तीन वा तीन पेक्षा अधिक वीज बिले भरून योजनेच्या लाभाची संधी ग्राहकांना उपलब्ध करण्यात आली आहे.ही योजना महावितरणच्या अशा लघुदाब चालू (एल टी– लाईव्ह) वीजग्राहकांसाठी लागू असून, ज्यांनी ०१ एप्रिल २०२४ पूर्वी मागील एक वर्ष म्हणजे ०१.०४.२०२३ ते ३१.०३.२०२४ या कालावधीत एकदाही वीज देयकाचा भरणा केलेला नाही किंवा ऑनलाईन वीज देयक भरणा पर्याय वापरलेला नाही. अधिक माहितीसाठी महावितरणच्या अधिकृत स ं क ` त स्थ ळ ा g www.mahadiscom.in भेट द्यावी.ग्राहक रांगेत उभे राहण्यापेक्षा वेळ, श्रम व पैशांची बचत करीत डिजिटल पध्दतीने वीज बिल भरणा करण्यास प्राधान्य देत आहेत. ग्राहकांना डिजिटल पध्दतीने वीज बिलाचा भरणा करता यावा, यासाठी महावितरणकडून संकेतस्थळ, महावितरण मोबाईल पची सुविधा ग्राहकांना उपलब्ध करून दिलेली आहे. ग्राहकांना देय रक्कमेवर ०.२५ टक्के डिजिटल वीज बिल भरणा




सूट दिली जाते. परिणामी सध्या राज्यात ७० टक्के हून अधिक वीज ग्राहक ऑनलाईन पध्दतीने वीज बिलाचा भरणा करीत आहेत. हे प्रमाण वाढविण्यासाठी ग्राहकांना प्रोत्साहन देण्यासाठी लकी डिजिटल ग्राहक योजना राबविण्यात येत आहे.या योजनेच्या कालावधीत ग्राहकाने नेट बँकिंग, डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, यूपीआय, वॉलेट, कॅश कार्ड, एनएसीएच, क्यूआर कोड, एनईएफटी, आरटीजीएस इ. ऑनलाईन वीज बिल भरणा पर्याय वापरून लकी ड्रॉ महिन्याच्या अगोदर दरमहा एकप्रमाणे सलग तीन किंवा तीन पेक्षा जास्त महिने वीज बिल भरणे आवश्यक राहील. अधिक माहितीसाठी महावितरणच्या अधिकृत संकेतस्थळास www. mahadiscom.in भेट द्यावी.

# जमीन महसूलचे उद्दिष्ट पूर्ण

## १२७ कोटींपैकी ९३ कोटींची झाली वसूली

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२९अमरावती–** जिल्ह्यात दरवर्षी संकिर्ण, जमिन आणि गौण खनिज वसुलीकरिता उद्दिष्ट दिले जाते. यंदा १२७ कोटी २३ लाख १९ हजार रुपयांचे उद्दिष्ट महसुल विभागाला देण्यात आले होते. मार्च एण्डिंग संपायला केवळ तीन दिवस शिल्लक असताना वर्षभरात दोन्ही विभागांकडून ९३ कोटी ९२ लाख ७६ हजार रुपयांची वसुली करण्यात आली आहे. याची टक्केवारी ७३८२ टक्के इतकी आहे. यामध्ये जमिन महसुलाचे १३० टक्के उद्दिष्ट प्राप्त झाल्याने आता खनिकर्म विभागाकडे चार दिवसांत उद्दिष्टपूर्ती करीता ४१ कोटी ८६ लाख रुपयांच्या वसुलीचे मोठे आव्हान उभे ठाकले आहे.जमिन आणि गौण खनिज मधुन जिल्ह्याला मोठे उत्पन्न होते. त्यामुळे शासकाकडुन जिल्हास्तरावर वसुलीचे उद्दिष्ट दिले जाते. मागील काही वर्षापासून जिल्ह्याने शंभर टक्केच्यावर उद्दिष्ट पुर्ण केले आहे. यंदा सन २०२४–२५ या आर्थिक वर्षात जमिन व संर्किण या दोन्ही शिर्षात महसुल विभागाला २७ कोटी २३ लाख १९ हजारांचे उद्दिष्ट देण्यात आले होते. यामध्ये २६ मार्चपर्यंत ३५ कोटी ७८ लाख ७९ हजारांची वसुली करण्यात आली. याची टक्केवारी १३१ टक्के आहे.

खनिकर्म विभागाला गौण खनिजापोटी १०० कोटी रुपयांचे उद्दिष्ट असताना आजवर केवळ ५८ कोटी १२ लाखांची वसुली करण्यात आली. दोन्ही विभागाने १२७ कोटी २३ लाख १९ हजारांच्या उद्दिष्टातून वर्षभरात केवळ ७३.८२ टक्के म्हणजे ९३ कोटी ९२ लाख ७६ हजारांची वसुली केली आहे. आर्थिक वर्ष संपायला शेवटचे तीन दिवस शिल्लक राहिले असताना अद्यापही खनिकर्म विभागाला ४१ कोटी ८६ लाख रुपयांची वसुली बाकी असल्याने या वसुलीचे मोठे आव्हान या विभागासमोर उभे ठाकले आहे. यंदा घाटाचे लिलाव न झाल्याने खनिकर्म विभागाला याचा फटका बसला आहे. तर अद्यापही सुधारीत वाळू धोरण देखील अंमलात आणले नाही. त्यामुळे यंदा वसुलीचे उद्दिष्ट पुर्ण होईल का यात शंका आहे.––

# मालमत्ता कर वसूलीसाठी मनपा मध्य झोन क्र.२ ची धडक जप्ती मोहिम

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९अमरावती–** कर संकलन व कर आकारणी विभाग अमरावती शहर महानगरपालिका मध्य झोन क्र.२ राजापेठ यांच्या वतीने विविध सुट योजना देऊनही काही थकबाकीदार टॅक्स भरणा करण्यास टाळाटाळ करीत आहेत. त्यांच्यावर मनपा मध्य झोन क्र.२ राजापेठ मार्फत धडक जप्ती मोहीम राबविण्यात येत आहे. त्यानुसार क्षेत्रीय कार्यक्षेत्रामध्ये मालमत्ता कराच्या वसूलीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या वसूली पथकामार्फत कार्यवाही करण्यात आली आहे.

आज दिनांक २८ मार्च,२०२५ रोजी सहाय्यक क्षेत्रीय अधिकारी नर्मदा चव्हाण यांच्या नेतृत्वात मनपा मध्य झोनच्या पथकामार्फत वार्ड इ–९, मालमत्ता क्र. ४८६/३९, थकीत मालमत्ता कर रु.१,४५,३६७/– असून सदर मालमत्तेवर जप्ती व सीलची कार्यवाही करण्यात आली. या पुढेही थकीत कराच्या वसूलीसाठी नियुक्त पथकामार्फत जप्तीची कार्यवाही तिव्र करण्यात येणार असून सदर कार्यवाही अंतर्गत मालमत्ता सील करणे, आटकाव करणे इत्यादी कार्यवाही करण्यात येणार असून मालमत्ता जप्त किंवा सील करून मुदतीमध्ये मालमत्ताधारकांनी कर भरणा न केल्यास अशा मालमत्ताधारकांच्या मालमत्तेचा लिलाव, विक्री करून कर वसूल करण्यात येणार आहे.



तरी व्याज, शास्ती माफी योजनेचा लाभ घेऊन आपल्याकडे देय असलेल्या कराचा भरणा करावा व जप्तीसारखी कटू कार्यवाही टाळावी, असे आवाहन महानगरपालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांनी केले आहे. या कारवाईत निरीक्षक गजेंद्र हर्षे, मालमत्ता कर वसुली लिपिक रोशन चव्हाण, धरम बीवाड समय दुलगज उपस्थित होते.

# संस्कृती संवर्धन समितीतर्फे उद्या स्वागतयात्रा: हिंदू नववर्ष प्रारंभनिमित्त यात्रा मार्गातील मंदिरांना ध्वज प्रदान करण्यात येणार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९अकोला**

शहरात संस्कृती संवर्धन समितीच्या वतीने नगराचे आराध्य दैवत श्री राज राजेश्वर मंदिरातून चैत्र शुक्ल १, प्रतिपदा शके १९४७ अर्थात गुढीपाडवा रविवारी, ३० मार्चला सकाळी ७ वाजता हिंदू नववर्षाचे स्वागत करण्याकरिता स्वागत यात्रेचे आयोजन केले आहे. आर्य समाज मंदिर येथील सभागृहात आयोजित पत्रकार परिषदेत संस्कृती संवर्धन समितीचे अध्यक्ष प्रा.नितीन बाठे यांनी याबाबत माहिती देत या स्वागत यात्रेचा प्रारंभ महापूजेने होणार असल्याचे सांगितले.

ही दुचाकी यात्रा राज राजेश्वर मंदिर, विठ्ठल मंदिर चौक, काळा मारुती, सिटी कोतवाली चौकातून मोठे राम मंदिर मार्गे जुना कपडा बाजार, जैन मंदिर,गांधी चौक, तहसील ऑफिस, श्री राणी सती मंदिर, श्री गुरुद्वारा प्रबंधक समिती न्यू राधाकिसान प्लॉट मार्गे अशोक वाटिका येथे भारतरत्न डॉ.



बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून मदनलाल धिंग्रा चौकातून टॉवर चौक, रतनलाल प्लॉट चौक,नेकलेस रोड मार्गे सिव्हिल लाइन चौकातून जवाहर नगर चौक, १२ ज्योतिर्लिंग मंदिर तेथून राऊत वाडी मार्गे जठारपेठ चौकातून संकल्प ढोल पथकाच्या सोबत सातव चौक मार्गे बिर्ला लेआऊट मधील जलाराम मंदिर येथून मार्गक्रमण करत समारोप बिर्ला राम मंदिर येथे महाआरतीने होणार आहे.

तत्पूर्वी मंदिरात रामरक्षा पठण होणार आहे. या यात्रेतील मार्गात येणाऱ्या सर्व मंदिरांना ध्वज प्रदान करण्यात येणार आहे. यामध्ये लाठीकाठीचे प्रात्यक्षिक आणि गुलाब बाबा बँड पथकाचा समावेश राहणार आहे. या यात्रेत अकोल्यातील नागरिक पारंपरिक वेशभूषेत, फेटे घालून सहभागी होणार आहेत. तसेच यात्रेत मर्यादा पुरूषोत्तम प्रभू श्रीराम, सीता माई, लक्ष्मण, राम भक्त हनुमान यांचा राम दरबार विशेष आकर्षण राहणार आहे.

या नववर्ष स्वागत यात्रेत अकोल्यातील सर्व राष्ट्र प्रेमी नागरिक बंधु भगिनींनी सहपरिवार सहभागी व्हावे, असे आवाहन समितीचे स्वागत समिती अध्यक्ष अरविंद देठे, स्वागत समिती उपाध्यक्ष डॉ. पार्थसारथी शुक्ल, रामप्रकाश मिश्रा, डॉ. अभिजित नालट, मंगेश वानखडे, डॉ. प्रविण चव्हाण संस्कृती संवर्धन समिती, अकोलाचे अध्यक्ष प्रा. नितीन बाठे, संयोजक विनोद जकाते, सहसंयोजक स्वानंद कोंडोलीकर, राम भिरड, कोषाध्यक्ष शरद वाघ, महिला संयोजिका सोनल ठक्कर, रश्मी कायदे, मीनाक्षी आपोतीकर, प्रचार व प्रसार प्रमुख समीर थोडगे यांनी केले आहे, अशी माहिती या वेळी देण्यात आली.

# तिवसा नगरपंचायतीच्या अध्यक्षपदी प्रतिभा गौरखेडे अविरोध झाली निवड

## माजी आमदार यशोमती ठाकूर यांचे वर्चस्व अबाधित



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९तिवसा**

तिवसा नगरपंचायतीच्या अध्यक्षपदी कॅंग्रेसच्या प्रतिभा वसंतराव गौरखेडे यांची अविरोध निवड करण्यात आली. नगराध्यक्षपदासाठी त्यांचाच एकमेव अर्ज प्राप्त झाल्याने त्यांची अविरोध निवड झाली. सभेच्या वेळी कॅंग्रेसचे १५ तर विरोधी गटातील चार सदस्य उपस्थित होते. विरोधकांकडून एकही अर्ज न आल्याने त्यांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. माजी मंत्री ॲड. यशोमती ठाकूर यांनी पुन्हा एकदा आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे. नगराध्यक्ष योगेश वानखडेयांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या जागेसाठी ही निवड़णूक घेण्यात आली.पीठासीन अधिकारी म्हणून उपजिल्हाधिकारी ज्ञानेश्वर घ्यार यांनी कामकाज पाहीजे. निवड प्रक्रिया सकाळी ११ वाजता सुरू झाली. नगरपंचायतीचे सर्व १९ सदस्य उपस्थित होते. यामध्ये कॅंग्रेसचे योगेश वानखडे, किसन मुंदाणे, अमर वानखडे, प्रिया विघ्ने, प्रिती भुरभुरे, संगीता राउत, मंगला वानखडे, नरेंद्र लांडगे, अर्चना भोंबे, माधुरी पुसाम, प्रतिभा भगत, सीमा खाकसे यांच्यासह स्वीकृत सदस्य सचिन गोरे, वैभव वानखडे आदी सदस्य उपसथित होते. तर विरोधी गटातील चार सदस्य उपस्थित होते. नगराध्यक्षांची हंगामी जबाबदारी सांभाळणाया उपाध्यक्षा प्रिया विघ्ने यांनी अध्यक्षपदाचा पदभार नवनिर्वाचित अध्यक्षा प्रतिभा गौरखेडे यांच्याकडे सोपविला. यावेळी तहसीलदार आशीष नागरे यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते. प्रतिभा गौरखेडे यांच्या नावाची घोषणा होताच कार्यकर्त्यांनी फटाके फोड्न एकच जल्लोष साजरा केला. ॲड. यशोमतीताई ठाकूर यांच्या नेतृत्वात साजरा झालेल्या जल्लोषाच्यावेळी माजी सभाती दिलीप काळबांडे, तालुका कॅंग्रेसचे माजी अध्यक्ष मुकुंदराव देशमुख, शहराध्यक्ष सेतु देशमुख, नितीन मेहकरे, नरेंद्र विघ्ने, गजानन भोंबे, दिवाकर भुरभुरे, उमेश राउत, प्रणव गौरखेडे,प्रमोद वानखडे यांच्यासह शेकडो कांग्रेसचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# आठवडाभरात पारा ४०अंशावर भाजीपाला, फळबागांना चटका

## भाजी, फळे महागणार; वाढत्या तापमानामुळे उत्पादक अडचणीत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

गेल्या आठ दिवसांपासून तापमान ३९अंश सेल्सिअस किंवा त्यापेक्षा अधिक आहे. त्याचा परिणाम फळबागा व भाजीपाल्यावर होत आहे. उत्पादनात घट होत असल्याने शेतकरी अडचणीत आहेत. भाजीपाला व लिंबू महाग होणार आहेत. उष्णतेमुळे पिकांचे नुकसान कमी करण्यासाठी किंवा टाळण्यासाठी उपाययोजना करणे शेतकर्यांना आवश्यक आहे.



अमरावती जिल्ह्यात फेब्रुवारी महिन्यापासूनच वातावरणात बदल होत आहे. त्यामुळे आजारपणात वाढ झाली होती. सध्या व्हायरल कमी झाले असले तरी पिकांवर संकट येऊ घातले आहे. गहू काढण्यात आला असला तरी कांदा अजून बाकी आहे. फळबागा व भाजीपाला सध्या लागवड केलेले आहेत. यात प्रामुख्याने वांग्याचा समावेश आहे. लग्न सराईचे दिवस येत असल्याने वांग्याची मागणी अधिक असते. मात्र या वांग्यावर उष्णतेचा परिणाम होत असून चवही लागत नाही. ऊन्हाचा भाज्यांना फटका बसत आहे.

उन्हाळ्यातील ४० अंश सेल्सिअसपेक्षा जास्त असलेले कमाल तापमान व कमी झालेली आर्द्रता पेरू फळबागेतील फळधारणा योग्य रीतीने होण्यास बाधक ठरते व त्यामुळे फळगळ होऊन एकंदरीत उत्पादनात घट येऊ शकते. म्हणून उच्च तापमानापासून संरक्षण म्हणून फळबागेत सेंद्रिय आच्छादनांचा वापर करावा. सध्याच्या वाढत्या तापमानाची कक्षा लक्षात घेऊन कांदा पिकाला ४ ते ५ दिवसांच्या अंतराने ओलीत करावे तसेच ओलीत करताना ते प्राधान्याने सकाळी किंवा संध्याकाळच्या वेळेत करावे. मनीषकुमार ढगे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भुजल पातळीत घट तापमान वाढत असल्याने भूजल पातळी खालावत आहे. त्यामुळे पिकांना, भाजीपाला पिकांना, फळबागांना ओलीत करताना प्राधान्याने ठिबक किंवा तुषार सिंचन पद्धतीचा वापर सुरू झाला.

पिकांना चार दिवसांच्या अंतरात करावे ओलित सध्याच्या हवामान परिस्थितीत पिकाला पाण्याचा ताण बसू नये म्हणून ४ ते ५ दिवसांच्या अंतराने ओलीत करावे. कोरडे हवामान, उच्च तापमान लक्षात घेता सूर्यफूल पिकाला वाढीच्या अवस्थेत पाण्याचा ताण बसल्यास उत्पादनात लक्षणीय घट येऊ शकते. म्हणून पिकाला ४ ते ५ दिवसांच्या अंतराने ओलीत करावे. कमाल तापमान ३७ अंश सेल्सिअसच्या वर गेल्यास लिंबू झाडांची वाढ कमी व्हायला सुरुवात होते. म्हणून ठिबक सिंचनाने ४ ते ५ दिवसांच्या अंतराने लिंबू बागेला ओलीत करावे.

# सामाजिक कार्यामुळे वंचितांना मोठा आधार - कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

## विद्यापीठात महिला – पुरुषांना अध्यासन केंद्राच्यावतीने वस्त्रदान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

धर्म, जातीच्या पलिकडे माणूस केवळ माणूसच असतो, या आपल्या विद्यापीठ गीताप्रमाणे विद्यापीठ आणि समाज एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. विद्यापीठाच्या संत गाडगे बाबा अध्यासन केंद्राव्दारे गरजूंना विविध उपक्रमाव्दारे होणारी मदत ही निश्चितच अभिनंदनीय बाब असून अशाच समाजकार्यामुळे वंचितांना मोठा आधार मिळतो, असे उद्गार कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी काढले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील संत गाडगे बाबा अध्यासन केंद्राच्यातीने गरजूंना वस्त्रदान कार्यक्रमात अध्यक्षीय भाषण करतांना कुलगुरू बोलत होते. व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, व्य. प. सदस्य डॉ. व्ही.एम. मेटकर, संत अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटल व रिसर्च इन्स्टिटएटचे अध्यक्ष




डॉ. अनिल सावरकर, श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्था, अकोटचे अध्यक्ष श्री वासुदेवराव महल्ले, अध्यासन केंद्राचे प्रमुख डॉ. दिलीप काळे उपस्थित होते.

याप्रसंगी डॉ. अनिल सावरकर म्हणाले, संत अच्युत महाराजांनी एका मुस्लिम मुलीच्या ह्मदयरोगाच्या आजाराचे गांभिर्य ओळखून गोरगरीबांसाठी हॉस्पिटलची उभारणी केली आणि आज संत अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटल हे महाराष्ट्रातील एकमेव असे अत्याधुनिक हॉस्पिटल असून त्या ठिकाणी अत्यल्प दरात मोठमोठए शस्त्रक्रिया केल्या जातात. संत गाडगे बाबांच्या विचाराला अनुसरुन हा कार्यक्रम होत असल्याचे सांगून डॉ. श्रीकांत जिचकार यांच्या आठवणींनाही त्यांनी उजाळा दिला. श्री वासुदेवराव महल्ले म्हणाले, पस्तीस वर्षांपूर्वी श्री संत वासुदेव महाराजांनी विद्यापीठात उद्बोधन केले होते. संत गाडगे बाबा व श्री संत वासुदेव महाराज यांच्या जीवनकार्यावर यावेळी त्यांनी प्रकाश टाकला. यावेळी संत अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटलविषयी सचिव श्री पाचबांधे यांनी, तर संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्थेचा परिचय श्री बाळकृष्ण आमले यांनी करून दिला.

याप्रसंगी कांता धांडे, पुष्पा वंजारी, कल्पना ढेंगरे, सविता पारधी, गंगा महेंद्रकर, राजकुमार इंगळे, राजू मकेडार, रितेश तायडे, रमेश कोल्हे, नामदेव चाचरकर आदींना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते वस्त्रदान करण्यात आले. तर संत गाडगे बाबांच्या दशसूत्रीनुसार कार्य करणा–या अकोला येथील श्री सुखदेव भुतडा यांचा शाल, सन्मानचिन्ह व पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला. धारणी तालुक्यातील लवादा येथील सहदेव शनिवारे यांनी बांबूपासून तयार केलेल्या संविधान उद्देशिकेचे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. तसेच बांबूपासून तयार केलेले घडएळ कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांना भेट देण्यात आले. राष्ट्रगीत व विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. संत गाडगे बाबांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक डॉ. दिलीप काळे, सूत्रसंचालन श्री राजेश पिदडी, तर आभार चंद्रकांत पाखरे यांनी मानले. कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवर, अमरावती शहरातील गणमान्य नागरिक, महिला, पुरुष उपस्थित होते.

# वडाळी तलाव गार्डन नजीकच्या अतिक्रमणावर चालला बुलडोजर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

शहरातील वडाळी तलाव पुलापासून ते गार्डनची भींतीला लागून चांदूर रेल्वे रोड पर्यंत बरेच दुकानदाराने झोपड्या बांधून चहा कॅन्टीन, हॉटेल ची दुकाने, लोखंडी पान ठेले व इतरत्र दुकाने थाटली होती त्यासर्व दुकानांवर महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने बुलडोजर चालविला



आहे. या ठिकाणी काही दुकानदार दुकानांमध्ये दारू विक्री मादक पदार्थ विक्री करत असल्यामुळे तेथील रहिवासी लोकांना येणारा जाणारा करिता खूप त्रास वाढल्यामुळे लोकांची वारंवार भ्रमणध्वनीवर तक्रार प्राप्त येत असल्यामुळे कारवाईची दक्षता घेता त्वरित सर्व अतिक्रमण काढून १ ट्रक साहित्य जप्ती मध्ये घेण्यात आले. सदर कारवाई श्री श्याम चावरे अतिक्रमण पथक प्रमुख यांची उपस्थितीने अतिक्रमण कर्मचारी हजरपुरा पोलीस स्टेशनचे पोलीस कर्मचारी यांचे माध्यमातून करण्यात आली.

# भरती मेळाव्यातून १६० प्रशिक्षणार्थी उपक्रम

## धामणगाव आयटीआयआय मध्ये पर्याय



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९धामणगाव रेल्वे**

बगाजी महाराज राज्य औद्योगिक प्रशिक्षण संस्था, धामणगाव रेल्वे (आयटी) येथे गुरूवारी आयोजित कार्यक्रम भरती मेळाव्यातून १६० प्रशिक्षणार्थ विकसित करणे चांगले आहे.

सदर कार्यक्रमाचे उद्घाटन सभासद प्रताप अडसड यांचे वजन. तर विशेष अतिथी संस्था प्रशासनाचे अध्यक्ष तथा उद्योजक हेमकुमार जाधव, संस्था व्यवस्थापन समिती सदस्य अजय ठाकूर, हिंगणगाव ग्रा.पं. सरपंच दुर्गाबक्षसिंग ठाकूर, प्राचार्य ए. डी. वाळके व मेव्याकरीता खाजगी कंमन्यांचे सहकारी आदींची होती. आयटी, पदवी, पदविता धारक सार्वजनिक १६०आयका पात्राला समर्थनाची या मेळाव्याव्दारे पक्षातून. सदर मेव्याच्या परित्येकरीता कार्याचा प्राचार्य धोके प्रफुल्लते तथा सर्व शिल्पनिदेशकांनी घेतले.

# परवाना असलेल्या सावकाराच्या घरी धाड

## परवान्याचे नुतनीकरणच नसल्याने कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

नांदगाव खंडेश्वर येथील परवानाधारक सावकार मंगेश मधुकर डिभे यांनी २०२३–२४, २०२४–२५ या कालावधीत सावकारी परवान्याचे नुतनीकरण केले नसल्याचे सहायक निबंधक, सहकारी संस्था, नांदगाव खंडेश्वर यांच्या निदर्शनास आल्याने सावकार डिभे यांना पोस्टाद्वारे परवाना नुतनीकरण करण्याची नोटीस बजावण्यात आली. मात्र, त्यांच्याकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने सावकार डिभे यांच्या गजानन लक्ष्मी ज्वेलर्सआर्ट, मेन रोड, नांदगाव खंडेश्वर या प्रतिष्ठानासह घरावर धाड घालण्यात आली. त्यावेळी ते बाहेरगावी निघून गेल्याचे कळून आले. त्यानंतर त्यांच्या प्रतिष्ठानाची पथकाद्वारे तपासणी करण्यात आली. सुमारे ५ तास तपासणी सुरू राहिली. शुक्रवार २८ रोजी तपासणी पथक नेमून परवानाधारक सावकाराच्या घराची सकाळी १०.३० पासून दुपारी ३ वाजेपर्यंत झडती घेतली. त्यानंतर त्यांचा सावकारी परवाना रद्द करण्याची कारवाई सहायक निबंधक सचिन पतंगे करतील असे सहकार अधिकारी सुधीर मानकर यांनी सांगितले आहे.

# उद्या ला सांज पाडवा हिंदी मराठी गीतांचा सुरमयी अविष्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९ अमरावती**

मराठा नव वर्षाचे स्वागत करण्यासाठी दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा प्रशांत डवरे मित्र मंडळ व शिव संकल्प प्रतिष्ठानच्या वतीने हिंदी– मराठी गीतांचा सुरमयी आविष्कार सांज पाडवा या संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.येत्या रविवार दिनांक ३० मार्च २०२५ रोजी सायंकाळी ६.३० वाजता स्वामी विवेकानंद थीम पार्क , विलास कॉलनी ,कठोरा नाका जवळ अमरावती येथे ही सुरांची मैफिल सजणार असून प्रसिद्ध गायक व संगीतकार डॉ. राजेश उमाळे व कलावंत आपल्या गायकीतून बहारदार गीतांची रंगारंग व सदाबहार सुरमयी प्रस्तुती देणार आहे. यावेळी प्रसिद्ध निवेदक नितीन भट , , सह गायिका शीतल भट , तेजस कडू,ईश्वर कांबळे, आदी कलावंत सुद्धा साथसंगत करणार आहे. मागील काही र्षापासून या संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन खास गुढीपाडव्याच्या पर्वावर करण्यात येत असल्याने स्थानिक भागात या कार्यक्रामाची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

# डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती १४ एप्रिल रोजी सर्वत्र साजरी केली जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय येथे वैद्यकीय विद्यार्थ्यांकडुन चालविण्यात येणा–या 'अभिव्यक्तीःद टाइमलेस टेल्स' (साहित्य समुह) तर्फे भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन १ एप्रिल ते १३ एप्रिल २०२५ दरम्यान सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत डॉ. पंजाबराव देशमुख रक्तपेढी, पीडीएमएमसी येथे करण्यात आले आहे.

रक्तदानाबद्यल जागरूकता वाढवणे आणि गरजू रूग्णांसाठी जीवनदायी रक्ताचा पुरवठा करणे तसेच 'रक्तदान करा,



जीवनदान द्या!', 'रक्तदानः मानवतेची खरी ओळख' हे या शिबिराचे मुख्य उदिष्ट आहे. तसेच महामानवाला योग्य श्रध्दांजली अर्पण करण्याचे साधण आहे.

या समाजपयोगी कार्यात सहभागी होण्याचे आवाहन श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री हर्षवर्धनजी देशमुख, अधिष्ठाताडॉ. अनिल देशमुख, वैद्यकीय अधिक्षक डॉ. पवन टेकाडे, प्रशासकीय अधिकारी डॉ. स्वप्निल मोहोड यांनी केले आहे. अधिक माहितीकरीता ९१३७३७७५४८ / ९३२५७९४६४७ / ७०३०३८७५७६ / ९२८४०७६७८५ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

# ३० मार्चला चंद्र दिसल्यास ३१ला ईद अन्यथा १ एप्रिलला साजरी होणार

## ईद-उल-फितर, कच्छी मस्जिदचे अध्यक्ष जावेद जकारिया यांची माहिती



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अकोला**

पवित्र रमजान महिन्याच्या समाप्तीची प्रतीक्षा ईद-उल-फितरच्या चंद्रदर्शनावर अवलंबून आहे. इस्लामिक कॅलेंडरनुसार, ईद-उल-फितर ही शव्वाल महिन्याच्या पहिल्या तारखेला साजरी केली जाते; जी रमजानच्या २९ किंवा ३० व्या रोजानंतर येते. यावर्षी ३० मार्च २०२५ रोजी चंद्रदर्शन होण्याची शक्यता आहे. जर चंद्र दिसला, तर भारतात ३१ मार्चसी ईद साजरी केली जाईल.

मात्र, जर चंद्र दिसला नाही, तर ईद १ एप्रिलला होईल,असे कच्छी मस्जिद, अकोलाचे अध्यक्ष जावेदजकारिया यांनी कळवले आहे. जावेद जकारियायांनी सांगितले की, //ईद ही आपसातील बंधुभाव आणिशांततेचा संदेश देते. प्रत्येकाने गरजूंना मदत करावीआणि सदका-ए-फितर अदा करावे, जेणेकरूनप्रत्येकजण या आनंदात सहभागी होऊ शकेल. सरकारीकॅलेंडरनुसार, जर ईद ३१ मार्चला झाली, तर त्या दिवशीसार्वजनिक सुट्टी असेल. मात्र जर चंद्र ३० मार्चलादिसला नाही आणि ईद १ एप्रिलला झाली, तर त्यादिवशी सुट्टी असेल, असे जकारिया याचे म्हणणे आहे.

**चंद्रदर्शनाची परंपरा**

ईदचा चंद्र पाहण्याची परंपराअनेक वर्षांपासून सुरू आहे. चंद्र दिसल्याची पुष्टीकरण्यासाठी संपूर्ण देशभरातील चंद्र कमिट्या आणिधार्मिक संस्थांनी तयारी केली आहे. चंद्रदर्शन होताचमस्जिदीतून अधिकृत घोषणा केली जाते आणि त्यानंतरईदच्या तयारीला वेग येतो.

**ईदच्या तयारीला वेग**

बाजारात मोठी गर्दी पाहायला मिळतआहे. नवीन कपडे, मिठाई,शिरखुर्मा आणि ईदसाठी लागणाऱ्यावस्तूंच्या खरेदीला लोकांनी सुरुवातकेली आहे. तसेच, ईदी देण्याचीआणि खास पदार्थ बनवण्याचीतयारीही सुरू झाली आहे. आतासर्वांचे लक्ष ३० मार्चच्या सायंकाळीचंद्राच्या दर्शनाकडे लागली आहे.जर त्या दिवशी चंद्र दिसला, तर ३१मार्चला ईद साजरी होईल, अन्यथा १एप्रिलला साजरी होईल.

# देवघरासाठी मिनी गुढी ६० ते ३०० रुपयांपर्यंत

## बाजारात यंदा मागणी २० टक्क्यांनी वाढली; फ्लॅट संस्कृतीमुळे गुढ्यांची उंची कमी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

साडेतीन मुहूर्तापैकी एक असलेल्या पाडव्याच्या शुभमुहूर्तावर घरोघरी गुढी उभारली जाते. गुढीची पूजा करून नववर्षाचे स्वागत केले जाते. पूर्वीच्या काळी उंच-उंच गुढी उभारण्याची स्पर्धा असायची; परंतु आता फ्लॅट संस्कृती आल्याने गुढ्यांची उंची कमी झाली आहे. त्यामुळे बाजारात रेडिमेड मिनी गुढी विक्रीसाठी उपलब्ध झाली आहे. त्या ६० रुपयांपासून ते ३५० ते ४०० रुपयांपर्यंत उपलब्ध आहेत. यंदा मागणी २० टक्क्यांनी वाढल्याने व्यावसायिक सांगतात. रेडिमेड गुढी ही कमी जागेत उभारता येते. त्यामुळे छोटी काठी, छोटा तांब्या, नक्षीदार साडी आणि त्यावरील नाजूक सजावट अशी भुरळ पाडणारी गुढी सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे.

सुकलेल्या लाकडापासून तयार केलेल्या छोट्याशा गुढ्या बाजारात उपलब्ध आहेत. सर्वात लहान ६० रुपयांची तर सर्वात मोठी ३०० ते ३५० रुपयांपर्यंतची गुढी आहे. गुढीसाठी विविध प्रकारचे कापड बाजारात नव्याने दाखल झाले आहेत. खणाचे कापड आणि पैठणी महिलांना आकर्षित करत आहे. २०, २८ आणि ३६ इंच अशा स्वरूपातील कापड लहान-मोठ्या गुढीसाठी उपलब्ध आहेत. त्यांची किंमत २०० ते ४०० रुपयांपर्यंत आहे. मागणीत झाली वाढ पूर्वीच्या तुलनेत गेल्या दोन वर्षांपासून रेडिमेड गुढीला मागणी वाढली आहे. मागच्या वर्षाच्या तुलनेने ही मागणी २० टक्के जास्त आहे. लहान गुढी देवा जवळ ठेवता येत असल्याने तिला मागणी आहे. - संजय पाटील, विक्रेता. पारंपरिक गुढ्यांचे यंदाही ठरणार आहे आकर्षण पारंपरिक सजावट केलेल्या नावीन्यपूर्ण रंगीबेरंगी रेडिमेड गुढी विक्रीसाठी उपलब्ध आहेत. साहित्याची खरेदी करण्यासाठी नागरिकांची गर्दी शहरातील बाजारात दिसून येत आहे. यात मोची गल्ली, जवाहर गेट, अंबा मंदिर परिसर, राजापेठ, नवाथे, राजकमल चौक, इतवारा लहान, पण दिसायला सुंदर असलेल्या रेडिमेड गुढीला ग्राहकांची अधिक पसंती आहे. खणाचे कापड, सोनेरी लेस आणि सोनेरी गोंड्यांनी गुढीचे वस्त्र सजवले आहे.

# अमरावती जिल्हा वकील संघाच्या निवडणुकीसाठी मतदान प्रक्रिया सुरू : उद्या सकाळपासून मतमोजणीला होणार सुरुवात



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

अमरावती जिल्हा वकील संघाच्या २०२५-२०२६ वर्षांसाठीच्या कार्यकारीणीच्या निवडणुकीसाठी आज मतदान प्रक्रिया सुरू झाली आहे. अमरावती जिल्हा व सत्र न्यायालय परिसरात सकाळपासूनच वकील मतदार मोठ्या संख्येने मतदानासाठी हजर राहिले आहेत.या निवडणुकीत अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, ग्रंथालय सचिव आणि कार्यकारी सदस्यपदांसाठी चुरशीची लढत पाहायला मिळत आहे. अध्यक्षपदासाठी ॲड. सुनील देशमुख आणि ॲड. हरीश निंबाळकर यांच्यात थेट मुकाबला होत असून, उपाध्यक्षपदासाठी ॲड. विनोद दशस्त्र आणि ॲड. आशिष लांडे यांच्यात स्पर्धा आहे.सकाळपासूनच मतदान केंद्रावर मतदारांची गर्दी दिसून येत आहे. उमेदवार व त्यांच्या समर्थकांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, विजयासाठी प्रत्येकजण शेवटच्या क्षणापर्यंत प्रयत्नशील आहे. उद्या सकाळी मतमोजणी होणार असून उद्या दुपारपर्यंत निकाल हाती येणार आहे.

# उन्हाळयामुळे राज्यातील सर्व शाळांच्या वेळा सकाळच्या सत्रात

## शिक्षण संचालक यांचे आदेश धडकले विदर्भात मार्च महीण्यातच सुर्य ओकत आहे आग



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

उष्णतेच्या लाटांमुळे आरोग्याविषयी गंभीर समस्या निर्माण होण्याची संभावना लक्षात घेऊन जिल्हा स्तरावरुन उष्णतेचा लाटेचा प्रभाव कमी करण्यासाठी संबंधीत प्रशसकीय विभाग, महानगरपालिका / नगरपालिका व जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणांनी करावयाच्या उपाययोजनाबाबत मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत.राज्यात मार्च महीण्यातच उष्णतेचा पारी ४०अंशी पार केला आहे.राज्यातील शाळेच्या वेळेत बदल करण्याची मागणी शिक्षक संघटनांनी केली होती.राज्यामध्ये वाढलेल्या उन्हाच्या कडाक्यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर होणारा विपरीत परिणाम टाळण्यासाठी विविध संघटनांकडून शाळेची वेळ सकाळची करण्याबाबत निवेदन प्राप्त झालेली आहेत. तसेच काही जिल्हयांनी सकाळ सत्रात शाळा भरविणेबाबत आदेश निर्गमित केले आहेत. तथापि या सर्व जिल्हयांमध्ये शाळेचे वेळापत्रक वेगवेगळे असल्याचे निदर्शनास येत आहे. राज्यातील सर्व शाळांमध्ये वेळापत्रक / शाळेची वेळ यामध्ये एकवाक्यता असणे आवश्यक आहे.सदर बाब विचारात घेता, राज्यातील सर्व माध्यमाच्या व सर्व व्यवस्थापनांच्या शाळेची वेळ सकाळच्या सत्रात प्राथमिक शाळांसाठी सकाळी ०७.०० ते ११.१५ व माध्यमिक शाळांसाठी ०७.०० ते ११.४५ अशी करण्यात यावी. (सोबत वेळापत्रक जोडले आहे.) स्थानिक परिस्थितीनुसारमा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने या कालावधीमध्ये बदल करता येईल. उष्णतेच्या लाटेच्या प्रभावास प्रतिसाद देण्यासाठी खाली नमूद सूचना विद्यार्थ्यांना देण्यासाठी आपल्यास्तरावरुन सर्व शाळांना कळविण्यात यावे.असे आदेश शिक्षण संचालक पुणे यांनी दिले आहे.

# अकोल्याच्या अभ्यंकर परिवाराच्या संकल्प पुर्तीला अयोध्या राम मंदिर ट्रस्टकडून मिळाली परवानगी : १ लाख राजगिरा लाडूंचे होणार वाटप



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अकोला**

श्री राजराजेश्वर नगरीमध्ये श्रीराम भक्तांची संख्या मोठी आहे. अयोध्या येथे श्रीराम मंदिर स्थापनेचे स्वप्न करोडो भाविकांनी बघितले. यासाठी विविध संकल्प घेतले. मागील वर्षी अयोध्या येथे श्रीराम मंदिराचा भव्य लोकार्पण सोहळा पूर्ण झाला. श्रीराम भक्तांचे स्वप्न पूर्णत्वास आले. यामध्ये अकोल्यातील अभ्यंकर परिवाराचाही समावेश होता. त्यांनी श्रीराम मंदिर स्थापनेनंतर १ लाख लाडू वितरणाचा संकल्प केला होता. ६ एप्रिल रोजी त्यांचा हा संकल्प सत्यात येतो आहे. अयोध्या श्रीराम मंदिर ट्रस्टकडून मंदिरामध्ये त्यांना लाडू वितरणाची परवानगी मिळाली आहे. अकोल्यातील श्री राजराजेश्वर मंदिर, जुने शहरात सध्या राजगिरा लाडू तयार करण्याचे काम जोमाने सुरू आहे. अयोध्येत ६ एप्रिलला रामनवमीला १ लाख राजगिऱ्याचे लाडू अकोल्यातील अभ्यंकर परिवार करणार आहे. हा विशेष मान त्यांना मिळाला आहे. आवश्यक संपूर्ण प्रक्रिया, पत्रव्यवहारानंतर त्यांना एक आठवड्यापूर्वी प्रसाद वितरणाची परवानगी मिळाली. हे लाडू अयोध्येत श्रीराम भक्तांना मोफत वाटप करण्यात येणार आहेत.

५०० किलो गूळ आणि ५०० किलो राजगिरा लाहीचा वापर करून लाडू सध्या अकोल्यात १ लाख राजगिऱ्याचे लाडू तयार करण्यात येत आहेत. उपक्रमासाठी अकोलेकरांची मोठी मदत मिळत आहे. दिवस-रात्र हे कार्य सुरू आहे. दरम्यान २ एप्रिलला संपूर्ण लाडू ट्रकद्वारे अयोध्येला पाठवण्यात येणार आहेत. लाडू तयार करण्यासाठी ५०० किलो गूळ आणि ५०० किलो राजगिरा लाहीचा वापर करण्यात आला आहे.

असे तयार होत आहेत लाडू श्री राजराजेश्वर मंदिरात १२५ भाविक दोन शिफ्टमध्ये लाडूचे मिश्रण तयार करणे आणि बांधण्याचे काम करीत आहेत. शुद्ध, सात्विक व पौष्टिक लाडूचे वितरण भाविकांना करण्यात येणार आहे. सकाळी ९ ते रात्री ८ वाजेपर्यंत लाडू बांधण्यात येत आहेत. लाडू बांधण्यासाठी सहभागी बांधवांसाठी येथेच भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे.

# ढाकणाच्या जंगलात भीषण वणवा : आगीत शेकडो हेक्टर जंगल अनेक वनस्पती खाक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९धारणी**

गुगामल वन्यजीव परिसरातील ढाकणाच्या जंगलात तीन-चार दिवसा पूर्वी आग लागल्याने आगीत शेकडो हेक्टर जंगल अनेक वनस्पती खाक झाल्याने वन्यप्राण्यांची भटकंती स्पष्ट दिसत आहे. आगीची माहिती विभागाला सेटेलाईटच्या माध्यमाने प्राप्त होत असते, मात्र कर्मचारी सुस्त असून आदिवासी किंवा स्थानिक मजूर व्याघ्रला सहकार्यासाठी तयार होत नसल्याने २४ तासानंतरच कारवाई सुरु होत आहे, हे दुदैव.धारणी पासून २७ कि.मी. अंतरावरील ढाकणा रेंजमधील सभेचाखेडा भागातील अंबाकुडी ते कापरखेडा पर्यंतच्या जंगलातगेल्या सोमवारी प्रचंड आग लागलेली होती. भोंग्या-भोंगळीच्या जंगलात पोहचून लोअर मशीनद्वारे काही प्रमाणात आगीवर नियंत्रण करण्यात आले. मात्र ढाकणा रेंजच्या कर्मचाऱ्यांना स्थानिक आदिवासींनी आणीबाणीत सहकार्य न करण्याचा निर्णय घेतलयने सहसा कोणीच मजूर आग विझविण्यासाठी तयार होत नाही. आगीवर नियंत्रणासाठी व्याघ्रप्रकल्पा जवळ मॅन पावर कमी असल्याने आणि जंगलात पोहचण्यासाठी पायवाट माहिती नसल्याने २४ तासानंतरच आगीवर नियंत्रण करण्याची पुरूवात झाली. तोपर्यंत मोठे जंगल जळून खाक झाले. मोठी झाडे जळाली. जंगलातील उष्णता वाढल्याने वन्य प्राण्यांची भटकंती सुरू झाली आहे.उन्हाळ्यात वन्यप्राणी गाव शिवारात प्रवेश करण्याची शक्यता नाकारता येत नाही. सनद असो की, गेल्या आठवड्यापासून धारणी व चिखलदरा तालुक्यात उष्णता वाढलेली असल्याने जंगलात ठिकठिकाणी आगी लागत आहेत. ढाकणा रेंजच्या जंगलातील आगीचे कारण अद्याप अधिकाऱ्यांना सापडलेले नाही, ही सुध्दा एक शोकांतिका म्हणावी लागेल.

# सोयाबीन आणि धान्याच्या कुटारातून मशरूमची निर्मिती; मेळघाटात यशस्वी प्रयोग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९ मेळघाट**

जंगलातून मशरूम आणून खाणं हे मोठं कठीण काम. जंगलातल्या मशरुमपेक्षा सोयाबीन आणि धान्याच्या कुटाराची भुकटी करून घरीच अवघ्या २२ दिवसात प्रथिनयुक्त मशरूमचं उत्पादन घेतलं जातं. मशरूम सुकवून घरी वर्षभर खायला मिळणं हे मोठ्या फायद्याचं. अमरावती जिल्ह्यातील सातपुडा पर्वतरांगांमध्ये वसलेल्या मेळघाटातील काही गावांमध्ये महिला घरीच मशरूमचं उत्पादन घेत आहेत.

अमरावती शहरालगत असणाऱ्या घातखेड कृषी विज्ञान केंद्राच्यावतीनं मागील सात वर्षांपासून मेळघाटातील आदिवासी शेतकऱ्यांना फायदा होईल असे विविध कार्यक्रम राबवण्यात येतात. हिमाचल प्रदेशातील सोलन इथल्या मशरूम संशोधन केंद्राच्यावतीनं मशरूम तयार करण्याचं तंत्र घातखेड कृषी विज्ञान केंद्राच्या माध्यमातून धारणी तालुक्यातील कारा, कोठा, नांदुरी, लाकटू, सावलीखेडा, बबईठाणा, नारदू या गावातील आदिवासी कुटुंबांना देण्यात आलं. सोयाबीन आणि धान्याच्या कुटाराची भुकटी करून त्यापासून मशरूमचं उत्पादन घेतलं जातं. या माध्यमातून



आदिवासी कुटुंबं मशरूमचं उत्पादन घेत आहेत, अशी माहिती घातखेड कृषी विज्ञान केंद्राच्या गृहविज्ञान विषयतज्ज्ञ डॉ. प्रणिता कडू यांनी दिली. हिमाचल प्रदेश इथल्या सोलन मशरूम संशोधन केंद्राच्या शिफारशीनुसार मेळघाटातील सात गावांमध्ये महिलांना सोयाबीन आणि धान्याच्या भुकटीपासून मशरूम तयार करण्यासाठी लागणारं साहित्य घातखेड कृषी विज्ञान केंद्राच्यावतीनं पुरवण्यात आलं. तीनशे रुपये खर्चातून एकूण ४ हजार रुपये प्रतिकिलो दराच्या मशरूमचं उत्पादन घेण्यात आलं. मशरूम उत्पादनाचा हा मेळघाटातील पहिलाच प्रयोग यशस्वी ठरला आहे, अशी माहिती डॉ. प्रणिता कडू यांनी दिली.